
कार्तिक हजारे
पेरजागढ
एक रहस्य
भाग-३

# पेरजागढ... एक रहस्य भाग ३

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पेरजागढ... एक रहस्य

# भाग ३

लेखक

## कार्तिक गुलाब हजारे

पेरजागढ... एक रहस्य भाग ३

लेखक... कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com

फेसबुक... https//www.facebook.com... karthik hajare

पत्ता.. मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३...

मु. मिंथूर, पोस्ट: नवेगाव( पांडव), तालुका: नागभिड, जिल्हा: चंद्रपूर.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ३० मार्च २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.



वाचनाची आवड मला तशी लहानपणा- पासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचु शकतो? याची प्रचिती मला सुखदेवे सर नेहमी द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने शाळेतील कित्येक संस्कृतिक भागात माझी आवर्जून निवड व्हायची. पण कालांतराने आर्थिक परिस्थिती मुळे माझी शाळा सुटली आणि अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो.

कालांतराने तेही बंद झाले. कारण कामाच्या व्यापात मी अडकत राहिलो. पण सवयी प्रमाणे वि. स. खांडेकर, सुहास शिरवळकर अशा बऱ्याच लेखकांच्या पुस्तिका मी वाचून काढायचो. त्यातून माझ्यातल्या कलाकाराचा एक नवीन जन्म व्हायचा. आणि मी परत शुरुवात केली. "कुणाच्यातरी आठवणीत" ही माझी पहिली कविता. जी आजही बेधुंद लहरी माध्यमावर झळकते आहे.


पुढे कथा, कविता, लेख, चारोळी असे बरेच प्रकार त्यात समावेश करू लागले. पण काहीतरी लिहायचं? हा प्रश्न मनातून जाईना. कादंबऱ्या वाचताना मी पात्रांची, भावनांची विचारसरणी व्यक्त करत गेलो. आणि नव्या जोमाने लिहायला लागलो.


शब्दांचा हा निरंतर प्रवास,
संपूच नये कधी...
आयुष्य जगुनी जावे,
शब्दांच्या परी..
असावे वळण आयुष्याला,
शब्दांच्या संगतीचे...
अगदी अश्रुसुद्धा गोठतात,
शब्दांच्या घरी...

लिहायला जितकी भीती वाटत नाही ना, एक प्रकारे ती भीती आपलं लिखाण दुसऱ्याकडे दिल्यावर वाटते. आपल्या भावना, आपले विचार त्यांना पटतील का? आपलं लिखाण त्यांना आवडेल का? पण केला प्रयत्न... आणि थोडाफार यशस्वी झालो. आणि आता त्याच थोड्याफार प्रयत्नाने लिहत आहे.

आपला

कार्तिक हजारे









कार्तिक हजारे यांची पुस्तके.

त्यांच्या या कव्हरवर क्लिक केल्यावर ते ते पुस्तक उघडेल.

वाचायलाच हवीत ही पुस्तकं. वाचून झाल्यावर कशी वाटली ते कळवा.

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२/ व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com



सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार,तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार....

नागभिड तालुक्यातील मिंथुर या छोट्याश्या गावातील रहिवासी "कार्तिक हजारे" हे आमचे मित्रच आहेत. घरी कुठलीही परंपरा नसताना केवळ प्राथमिक शाळेतून त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून कथा ते कादंबरी असा प्रवास करतात. घरची परिस्थिती बेताची असताना सुद्धा त्यांचे प्रयत्न अगदी धैर्यशील असतात. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

पेरजागढ हे नागभिड पासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर स्थित सोनापूर या गावापाशी वसलेली प्रसिद्ध डोंगररांग आहे. ज्याला सात बहिणीचे डोंगर म्हणून पूर्ण महाराष्ट्र ओळखतो. या पेरजागढाच्या प्राचीन अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. तसेच गावागावात सुध्दा या दंतकथा पोचल्या आहेत. लेखकाने या गडाचा इतिहास कादंबरीच्या माध्यमातून रेखाटून तो सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले आहे.

पेरजागढ एक रहस्य ही गूढ कथा लेखकाने विशेष उदाहरणे घेत तसेच गवखेड्यात घडणाऱ्या घटना लक्षात घेत अतिशय सुंदरपणे रेखाटली आहे. आता पुढे काय होणार? ही भावना प्रत्येक वेळेस मनात घर करून राहते. आणि वाचनाची उत्कंठा वाढत जाते. प्रस्तुत कथेमध्ये पेरजागढविषयी अतिशय उपयुक्त माहिती दिली आहे. तसेच

आजूबाजूचा प्रदेश याची तंतोतंत मांडणी केली आहे. ही कथा रेखाटताना लेखकाने ऐतिहासिक,वैज्ञानिक तसेच भौगोलिदृष्ट्या विचार केला आहे. आणि तसेच रितू, पवन आणि त्याचे मित्रमंडळी,इन्स्पेक्टर राठोड यांचे पात्र आणि त्याभोवती असलेली कथा कादंबरीचा दर्जा उंचावते. प्रस्तुत कथेत असलेली रंजक उदाहरणे,गडावरील वातावरण आणि जनावरे यांच्याविषयीचे लेखन पुन्हा त्यात तेज निर्माण करते.

लेखक गडाचे नियम समजावून सांगताना लिहितात की गडावर ज्या सात बहिणी लुप्त पावलेल्या होत्या त्या अविवाहित होत्या. त्यामुळे हळद लागलेली नवविवाहित मुलं यांचा सहवास गडाला भावात नाही. मासिक पाळी असलेल्या किंवा दारू,मांस सेवन केलेल्यांना हे असलं काही तिथे चालत नाही. ते जंगल त्यांना खायला उठतो.

अशा विविध गोष्टी या कादंबरीत आलेल्या असून त्यासोबतच गडाचा इतिहास सुद्धा आलेला आहे. एका रहस्यमय कादंबरीला ज्या प्रकारची पटकथा आवश्यक असते ती लेखकाने यात मांडली आहे.

"पेरजागढ- एका रहस्य... भाग 2" हे सर्वांना आवडेल यात तिळमात्र शंका नाही. लेखकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!!!

समीर श्रिधरराव भोयर...
(शिक्षक)

## अभिप्राय... दुर्गा सुरेश जराते

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार. तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार...

ई साहित्यवरील मीसुद्धा एक वाचकच आहे. आणि बऱ्याच पुस्तिका वाचत असते. जे डोळ्यांनी बघतो ते खरं मानणाऱ्यापैकी मी एक आहेच. परंतु जे बघता येत नाही, ते डोळ्यांदेखत असते असे सत्व मान्य करणारे बरेच कमी आहेत. "पेरजागढ... एक रहस्य" ही एक रहस्यमय कथा, लेखकाने खूप छानपणे रेखाटली आहे.

मला वाचत असताना जी उत्कंठा लागली होती, की आता पुढे काय होणार? काय घडलं असेल नेमकं? काय वळण घेईल प्रकरण? या प्रश्नार्थक साखळीने गुंतवणूक करून ठेवण्यात लेखक नक्कीच यशस्वी झाले आहेत.

प्रस्तुत कथेमध्ये लेखकाने पवन आणि रितूची लव्हस्टोरी, पवन - आईचं प्रेम, अमर -प्रदीप -नमन - सदू यांच्याशी असलेली मैत्री. आणि या सगळ्या पात्रांना एकवटून एक रहस्य गुंतवलेले आहे. मृत्यूचं... शेवटी जेव्हा नमनने ती थैली पवनला दिली. तेव्हा वाटलं की, काय तो

मार्ग निघेल? परंतु लेखकाने जो सस्पेन्स ठेवला आहे. तो फारच अप्रतिम आहे. जे वाचकांना सुद्धा नक्कीच आवडेल.

ई साहित्य वरील लेखकाचे "प्रेमाचे अस्तित्व", "काही राहून गेलं होतं" आणि "मुक्ती" या कथांच्या माध्यमातून त्यांनी त्यांचं जे उत्तम लिखाण सादर केलंय. ते खरंच विचार करायला लावणारे आहेत. आणि मलाही ते वाचायला आवडलेच.

मला नक्कीच आशा आहे की, सत्य आणि सत्वाच्या पलीकडे असलेली ही रहस्यमय कथा. नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. आणि अश्याच पद्धतीने लेखकाने लेखन करावे ही आम्हा वाचकांकडून त्यांना शुभेच्छा...

दुर्गा सुरेश जराते.
ब्रम्हपुरी.

सत्य आणि सत्वाच्या वाटचालीवर पाऊल टाकताना, आम्ही खूप दूर आलोय याची सारखी प्रचिती येत होती. पण सगळ्या गोष्टींना गृहीत धरून थोड्याफार कल्पनेने रेखाटलेली ही भटकंती बुद्धिमत्ता, देवत्वाबद्दल असणारी श्रद्धा, गडाविषयी अतोनात प्रेम, नैसर्गिक महत्त्व आणि ऐतिहासिक असा जपलेला ठेवा. हे सगळं यात वर्गीकरण करण्यात आलं आहे. कित्येकदा वाघाची डरकाळी, अस्वलाचं गुरगुरणं आणि सापांचं सरपटणं अश्या बऱ्याच भयावह गोष्टींना आम्ही सामोरी गेलो.

कित्येक रहस्यांचा उलगडा करताना हृदयाची स्पंदने वाढून जायची. पण आज या प्रवासाला इतक्या चांगल्या पद्धतीने रंगवताना, मी कधीच बघितले नव्हते. इतर प्रवासासारखा हाही प्रवास काही क्षण चित्रांचा राहील असं मला वाटलं होतं. पण लेखकाने मनोरंजन, सत्वाचं अध्ययन आणि स्थळांची उलाढाल अश्या सगळ्या गोष्टींची पूर्तता अगदी तंतोतंत केली. ज्यामुळे हा प्रवास या पुस्तकाद्वारे आयुष्यातला एक अविस्मरणीय प्रसंग म्हणून डोळ्यासमोर ठेवला. त्याबद्दल मी लेखकाचे आभार मानतो. आणि त्यांच्या "पेरजागढ... एक रहस्य" या पहिल्या भागाला अनुसरून, पुढच्या भागासाठी शुभेच्छा प्रदान करतो.

पंकज माकोडे, नागपूर

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार,तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार....

ई साहित्य वरील खूप पुस्तिका मी वाचत असते.मला वाचनात गुंतत राहायला आवडते. "पेरजागड"ही एक रहस्य कथा आहे.वाचताना मी त्यात इतकी गुंतत गेले की काही क्षणापुरती का असो ना,की मी सुद्धा त्यातील एक पात्र आहे असे वाटायचे.आणि पुढे माझ्यासोबत पुन्हा काय घडेल? हा विचार सदा मनात घोळत असायचा.ही रहस्यकथा वाचत असताना मनाच्या गाभाऱ्यात असलेली चलबिचल कळते.विचार नवचैतन्य निर्माण करतात.कोणतीही कथा असो,पूर्ण वाचन केल्याशिवाय कधीच कळत नाही.आणि अगदी त्याच प्रामाणिक पद्धतीने लेखकांनी बारीक बारकावे मांडले.त्यांनी प्रत्येक भागात ठेवलेला सस्पेन्स वाचकांच्या तृणेला अगदी तडफडत ठेवतो.

सामान्य माणसाची निसर्गाबद्दल काय प्रचिती असते? आणि निसर्गाला नेमके काय हवे असते? हे त्या निसर्गातील एक अविभाज्य घटक असल्याप्रमाणे लेखकाने मांडणी केली आहे.रहस्यांचा उलगडा

घेत असताना मैत्रीचे, प्रेमाचे आणि मातृत्वाचे पण छान अशी उदाहरणे त्यांनी दिली आहेत.त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

अशाच प्रकारे आपण नेहमी लिखाण करावे व आम्हाला नव नवीन कथा वाचण्यासाठी मिळाव्यात हीच अपेक्षा.आपल्या पुढील वाटचालीसाठी अगदी खूप खूप शुभेच्छा....

चैताली राजेंद्र पाटील..

बद्रिनारायण बारवाले कॉलेज

जालना....

नमस्कार...

"पेरजागढ..एक रहस्य" भाग एकच्या अभिप्रायांनी मला प्रतीत झालं की पवनच्या हालअपेष्टा, रितुचं निष्काम प्रेम आणि रहस्यमय पेरजागढ या तिन्ही बाबी वाचकांच्या मनात उतरलेल्या आहेत.त्यासाठी बऱ्याच वाचकांनी फोन करून तर काहींनी पत्राने त्याचा अभिप्राय दिलाय.त्याबद्दल वाचकांचे मनापासून  आभार...

बऱ्याचदा असं होतं.संथगतीचा प्रवाह जेव्हा वाहतो,तेव्हा खळखळाटाचा निनाद स्वर काय असतो? हे कळायला उशीर लागतं.कारण गाभ्यात असलेला तळाचा अंतर दृष्टिक्षेपाच्या बाहेर असतो.ज्यामुळे त्याचे अनुमान सुद्धा तथ्य असतात. पेरजागढही थोडक्यात अशीच एक गाथा आहे. पवनला त्या गाभ्यात प्रवेश करताना खळखळाट आणि संथपणा या दोन्ही गोष्टींशी पूरक व्हायला हवं.पण हे सगळं घडण्यासाठी त्याला परत गडावरही यायला हवं.

प्रस्तुत कथेमध्ये नमनला मृत्यूच्या आहारी जाताना परात एकदा आपला पवन एकांती वाटेवर स्थिर होतो.इन्स्पेक्टर राठोडला कळून


चुकते की त्याच्या कायद्याची सत्ता त्याहीपेक्षा महासत्ता तिथे रेंगाळत असते.पण स्वतः मृत्युदेव जेव्हा रितुला जाणीव करून देतो की पवन कुठे आहे? कुठे अडकला आहे? तेव्हा तिचं अधीर होणं आणि पवनच्या वाटचालीची पुन्हा एकदा शुरुवात होणं दाखवल्या गेलं आहे.

इ साहित्याच्या चालू असलेल्या घडामोडीला माझा नेहमीच आधार असेल. त्यामुळे मी श्री.सुनील सामंत आणि ई साहित्य टीमचं आभार व्यक्त करतो. आणि खास वाचकांच्या आग्रहास्तव सादर करतो...

"पेरजागढ- एक रहस्य"

भाग_3....

कार्तिक हजारे..



गडाच्या
आत जाणारी
एक गुहा..




घोडपाक पर्वतावर असलेला...गोंडा महादेव.

जिथे सदोदित एका पट्टेदार वाघाचे वास्तव्य असते.

ढोरघाट...दगडांची चढाई..





जिथून पेरजागढाचे अंतर भरपूर लांब असते.

# महापाषाणयुगीन संस्कृती (Megalithic Culture)

महापाषाणयुगाला (Megalithic) महाश्मयुगीन व बृहदश्मयुगीन या नावानेही ओळखले जाते. हे नाव त्यांच्या ओबडधोबड शिळांची रचना करून स्मारकं उभारण्याच्या पद्धतीमुळे मिळाले. मानवी सांस्कृतिक इतिहासात महापाषाणयुग वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाचे ठरलेले आहे.

त्याचं कारण म्हणजे या संस्कृतीचे अवशेष जगात जवळपास सर्वत्र मिळतात आणि महापाषाणयुगीन दफन पद्धतीशी संलग्न असलेल्या काही प्रथा आताही मोजक्या ठिकाणी प्रचलित आहेत.

अजूनही काही ठिकाणी सुरू आहे ही प्रथा

गडचिरोलीतील काही भागात माडिया समाजात तसेच छत्तीसगड, झारखंडमधील मुंडा, संथाल अश्या काही समुदायांमध्ये या प्रकारच्या दफनपद्धती अजूनही अस्तित्वात आहेत.

जिथे आजही लोकं मृतव्यक्तींच्या आठवणीमध्ये दगडांची, लाकडांची स्मारकं उभारतात. जर आजच्या संदर्भात पाहायचं झालं तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींचे 'शक्तीस्थल' स्मारक हे सुध्दा एकाश्म स्मारकाचं प्रतीक आहे. हुतात्मा व अमर जवानांच्या स्मरणार्थ सुद्धा अश्याच प्रकारचा प्रतीकात्मक शिलास्तंभ उभारला जातो.




तास...

भावाच्या डोंगरावर असलेले एक श्रद्धास्थान.द गडांवर असलेला पाण्याचा प्रवाह हा बारमाही असतो.



खोल खाईत
असलेला
हत्तीखोयाळ.

कोरडा पडलेला सातधारा धबधबा...



# अर्पण पत्रिका

सदर कथा सर्व ज्ञात आणि अज्ञात रसिकांना समर्पित,

तसेच वेळोवेळी मदत करणाऱ्या माझ्या सर्व मित्रमैत्रिणीस समर्पित...

# पूर्ववत...

आभाळ गरजल्यासारखे त्याचे शब्द तिच्या कानात गुंजत होते;आणि ती सावली तिच्या शरीरातून हवेसारखी आरपार झाली.ती त्या सावलीकडे निरखून बघत होती.आणि बघता बघताच ती सावली दिसेनाशी झाली.जरी बघायला गेलं तर त्या ताईताने मला वाचवलं जरूर होतं.पण एक प्रश्न अजूनही रितुला कोड्यात पाडून गेला होता.कारण शेवटी मी होतो कुठे?कुठे अडकलो होतो?...

त्या सावलीचं साम्राज्य संपताच रितू माझ्यापाशी निश्चलपणे बसून होती.कारण आता तिला स्वतःबद्दल एक किळस येऊ लागली होती.डोळे बंद करून मनात विचारांची दंगामस्ती हे तिच्या चेहऱ्यावर साफ दिसून येत होतं.काही क्षणांच्या एकांतानंतर तिने डोळे उघडले.एक ठाम निश्चय मनोमन तिच्या ओघावर झळकत होता.आता आपण पवनला आणायचं म्हणजे आणायच?जगाच्या कोणत्याच कोपऱ्यात जरी का तो अडकला असेल? तरी आपण त्याला आणायचंच!!!

सहजपणे तिने नजर माझ्या निपचित पडलेल्या श्वासावर टाकली.अलगद दोन थेंब तिच्या डोळ्यातून तराळले आणि सहज मला म्हणाली...कुठे आहेस रे तू?मला इथे आधाराला ठेऊन कुठे अडकला आहेस?जाताना येतो म्हणाला होतास.आजही ते शब्द जसेच्या तसे माझ्या कानात आहेत.मग माझ्यासाठी तू का आला नाहीस.का असं कोड्यात ठेवून आहेस.तुला हवं असेल तिथे त्या गरजेला मी तुझ्यासाठी यायला तयार आहे...पण एकदा तरी सांग ना रे

.कुठे आहेस तू?

कदाचित तो आवाज माझ्या कानापर्यंत यावं,आणि माझ्या शरीराच्या प्रतिक्रियेमध्ये हालचाल होऊन तिला आभाळ ठेंगणं व्हावं, असं बऱ्याचदा तिला वाटायचं.पण वेडंच ते.. असं बोलता न बोलता ठरते तरी काय? शेवटी आसवे गाळत केव्हा ती झोपेच्या स्वाधीन झाली.तिचे तिलाच कळले नाही...

पुढे चालू.....

## १७) गडाविषयी काकांचं मनोगत...

त्या दिवशी पेरजागडावरून येताना बऱ्याच काही शंका मनात धरून मी आलो होतो.ते सुन्न जंगल,आणि ते भयानक वातावरण,आणि ते छम छम् तर माझ्यासाठी एक कोडंच होतं.घरी परतल्यावर सगळ्यांनीच तसं माझी खुशहाली विचारली...काय मग?कसा वाटला पेरजागड? मी म्हटलं... बरंच आहे...

कारण थकून असल्यामुळे मी फार तर बोलूच शकणार नव्हतो.पण गावात कसं असतं, गप्पांचा विषय चालू करण्यासाठी एखादं विषय लागतो.कदाचित घरी येता येता पेरजागड हाच एक विषय झाला होता.अलीकडे घडलेल्या बऱ्याच गोष्टी याच्या त्याच्या मुखातून बरेचदा ऐकत होतो.

काही दिवसांपूर्वी म्हणे ट्रॅक्टर उलटली होती.ज्यामुळे बऱ्याच प्रमाणात जीवितहानी आली होती.त्याचे कारण चालकांनी बऱ्याच प्रमाणात दारूचे सेवन केले होते आणि काही स्त्रिया मासिक पाळीवर असताना सुद्धा तिथे आलेल्या होत्या.त्यामुळे नको ते घडले आणि इतक्या प्रमाणात जीवितहानी झाली.

मघापासून मी डोळे जरी का मिटून असलो तरी त्यांचं बोलणं मात्र अगदी टक लावून बघत होतो.आणि त्यांचं बोलणं ऐकल्यामुळे माझ्या माझ्या मनात बऱ्यापैकी एक प्रकारचं सात्विक न्यूनगंड निर्माण झालं होतं.कारण आत्तापर्यंत जे अनुभवलं होतं ते सगळं अस्तित्वाच्या पलीकडचं होतं.ज्याची दैनंदिन व्यवहारात कसलीच नोंद नाही.आणि माझ्यासाठी तर हे नवीन नव्हतंच.पण ज्या गोष्टीसाठी मी इथे आलो होतो ते मात्र आता कुतूहल राहिलं नव्हतं.आता तो माझ्या जगण्या मरण्याचा एक साधन झाला होता.

आता प्रत्येक ओढ पेरजागडविषयी गोष्टी जाणून घेण्यात कायम ओढत होती.आणि त्या प्रत्येक गोष्टी जाणून घेणे मला तितक्याच गरजेच्या होत्या.आणि बऱ्याचदा मी अनुभवल्यामुळे ते सत्य आहे की असत्य आहे यांत वाद घालण्याचा प्रश्नच येत नव्हता.नजरेसमोर एखादं वृत्त घडले की त्यात तथ्य पथ्य असतातच.आणि ते कथन करणारा सुद्धा तितक्याच नवलाईने ते सांगत असतो.

त्यांच्या गप्पा ऐकून मला कित्येकदा वाटलं की त्यांना विचारावं म्हणून.पण शेवटी अव्हेरले स्वतःला.उगाच पुन्हा त्यांना चघळायला विषय नको म्हणून गप्प झालो.एकतर मी तिथे नवीन

होतो आणि मला वाटते की स्त्रियांत गप्पा मारण्याचं काम हे पुरुषाचे कधीच नव्हे.त्या सायंकाळी थंडी जरा जास्तच जाणवत होती.त्यामुळे आल्या आल्याच भर थंडीत हात पाय धुवून मी शेकोटीपाशी जाऊन बसलो होतो.त्यांना कळू नये म्हणून उगाच मोबाईल मध्ये काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करत होतो.

पेरजागडविषयी बऱ्याच प्रमाणात व्हिडिओ होते. गूगलवर सुद्धा त्याबद्दल काही माहिती होती.पण त्यावर हिरवळीने माखलेले निसर्ग आणि त्यातील काही गमती जमती इतकीच माहिती होती.मुळात त्या गडाला सात बहिणीचे गड म्हणून का संबोधले जाते?त्या सात बहिणी कोण होत्या?सगळ्यात आधी या गडाबद्दल कुणाला माहीत झाले?या प्रश्नांची उत्तरे मात्र कुणाकडेच नव्हती.आणि तसं कुणी दाखवलं पण नव्हतं.फक्त ते एक श्रद्धास्थान आहे म्हणून ज्याने त्याने त्याची नोंद केली होती.आणि मला ते सगळे जाणायचे होते.

त्या दिवशी जेवण केल्यावर असेच आम्ही बसलो होतो.मी काकांना विचारलं...

"काका ह्या गडाला सात बहिणींचं गड का म्हणतात?नेमक्या ह्या सात बहिणी होत्या तरी कोण?"

"आता त्याबद्दल फारसं मलाही माहित नाही पण माझे बाबा सांगायचे की त्या नवतळा येथील माना जातीच्या मुली आहेत.त्यात प्रत्येकाची प्रतीक्रिया वेगवेगळी.कुणी म्हणतात की त्यांना वडिलांनी जंगलात हरवलं तर कुणी म्हणतात त्या स्वतः निघून आल्या होत्या.त्यामुळे खरं काय ते मलाही माहित नाही.पण त्यांचं तिथे वास्तव्य असल्यामुळेच त्या गडाला सात बहिणींचं गड म्हणून सगळे ओळखू लागले.

पण सगळयात आधी त्याचा शोध कुणी लावला?म्हणजे कुणी ते स्थळ बघितले?कारण ते गावापासून इतक्या दूर त्या जंगलात वसलेलं आहे.साधारण माणसाची तर हिम्मत पण होत नाही  तिथे जायची.

आमच्या बघण्यात पूर्वी तिथे टोंगरे महाराज राहायचे.तेच त्या गडावर राहायचे.ते त्या हिंस्त्र श्र्वापदांत कशा पद्धतीने असायचे त्यांचं त्यांना ठावूक.पण ते म्हणायचे की त्या गडात जिथे बहिणींचं छोटंसं मंदिर आहे.तिथून गडाच्या आत जाण्यासाठी एक रस्ता आहे.आणि आतमध्ये जिथे बहिणी असायच्या तिथे सात खोल्या आहेत.ज्यात दिवसभर आणि रात्रभर पण प्रकाश असतो.

"तुम्ही बघितले काय?"

नाही मी तेव्हा लहान होतो. टोंगरे बुवा म्हणजे अगदीच कृश होते.ते अगदी सहज त्या दगडांच्या कप्प्यात सामावून जायचे.आणि कदाचित तिथे राहून तितके सत्व पण त्यांच्या जवळ असतीलच.आणि शुरुवातीला फार क्वचितच लोकांना पण ते दिसायचे.त्यामुळे त्यांचा शोध लावणे हे योग्य आहे असे समजून गावकऱ्यांनी त्यांना शोधून काढले.त्या वेळेस ते मौन स्थितीत होते.त्यामुळे काही बोलू शकले नाहीत.

"मग काय झालं?"

शेवटी बोललेच ते...मग त्यांनी स्थळाबद्दल आणि त्या सात बहिणीच्या गडाबद्दल लोकांना सांगून प्रेरित केले.त्या भयाण जंगलात राहणे हे साधारण माणसाचे काम नाही, असे समजून त्यांना भेटायला पण दुरदुरून लोक येऊ लागले.देणगीदार झाले,ट्रस्ट स्थापन झाले,लोकांच्या श्रद्धा वाढल्या आणि कालांतराने यात्रेकरू पण वाढले.

"अच्छा... असं आहे...पण मग आता ते कुठे असतात?कारण गडावर तर कुणीच नसतं...?"

"बघ पवन... चांगलं तसच वाईट पण असतं.सत्ता नेहमी स्वार्थामुळे पालटत असते.एखादी संस्था बनवताना जो विचार मनात घोंगावत असतो.संस्था बनल्यावर तोच विचार बदलत जातो. राजकारणाचे काही आमिष असल्यामुळे काही प्रमाणात वादविवाद आणि ताणतणाव झाले.त्याअर्थी असल्या जागेत असे सात्विक मनुष्य फार काळ थांबत नाही.त्यांची जायची तर इच्छा नव्हतीच पण पोलिस रिपोर्ट वगैरे झाली आणि पोलिसांनी गाडीत घालून त्यांना त्यांच्या मूळ गावी घेऊन गेले.

"अच्छा...म्हणजे ज्यांनी या गडाचा शोध घेतला...ज्यांनी इथले महत्त्व लोकांना पटवून सांगितले.शेवटी त्यांनाच इथून जावे लागले."

ह्म्म....आहेत अजून काही तशी लोकं, पण काही त्यांचा वारसा जपणारे पण आहेत.आणि आता तर नावापुरताच ट्रस्ट स्थापित झालंय.कारण हे छोटंसं गाव असलं तरी राजकारण मात्र चांगल्या पद्धतीने गाजवणारे गाव आहे.

"आणि हो काका...उद्या माणूस बघुन देणार म्हणाले ना... जंगल फिरवण्यासाठी..."

"हो उद्या  सकाळीच त्याची भेट घालवतो तुला..."

जसं गडाविषयी मी बऱ्याच प्रमाणात ऐकलं होतं, तसेच त्या टोंगरे महाराजाविषयी सुद्धा मी बऱ्याच गावकऱ्यांकडून ऐकलं होतं.आणि आता तर काकाने पण बरंच काही सांगितलं होतं.तिथून निघताना मला न राहवून त्यांची भेट घ्यायची मनापासून आतुरता झाली होती.त्यामुळे त्यांचं वारसान जपणाऱ्या एका शिष्याकरवी मी त्यांचा पत्ता घेतला आणि त्यांच्या भेटीला निघालो.

रामगिरी पर्वताच्या पायथ्याशी एका आश्रमात त्यांनी देवदूताची कामगिरी हेरली होती.अगदी दुरूनच मनातल्या कल्पनेने मी त्यांची कलाकृती ओळखली.कृश शरीर,डोळ्यामध्ये असलेले एक अलवकिक तेज,ओघात एकही दंत शिल्लक नव्हता पण तरीही आवाजाची कठोरता शिगेला जात होती. फारसं काही त्यांच्याद्वारे माहीत नाही झालं, पण अशा बऱ्याचशा गोष्टींचं

समाधान त्यांनी मला दिलं होतं.आणि मला पाहिजे त्या माहितीसाठी त्यांच्या एका शिष्याचा पत्ता दिला.

लोकांनी सांगितल्याप्रमाणे टोंगरे महाराज खरंच एक कलाकार माणूस होते.आज त्यांचं वय शतक ओलांडून सातवा वर्ष पूर्ण करतोय.तरीही आवाजात तीच जरब होती.हेच त्यांच्याविषयी फार महत्त्वाची बाब होती.प्राणायाम,बद्ध पद्मासन,मौनव्रत अगदी प्रामुख्याने ते करत असत.त्यामुळे शरीराची रचना तशी त्यांनी अगदी तंतोतंत ठेवली होती.आजही भुकेवर त्यांची इतकी जरब होती की सकाळच्या प्लेटभर नाश्त्यावर ते अख्खं दिवस रात्र काढत होते.

त्यांनी सांगितले की १९१४ चा त्यांचा जन्म. कुमारवस्थेत त्यांनी जंगल तुडवण चालू केलं होतं.रानोमाळ हिंडता फिरता ते पेरजागडावर आले.तिथं त्यांना तपश्चर्या करण्यासाठी फार चांगल्या प्रमाणात स्थान मिळालं.अगदी अठरा महिने सतरा दिवस विना अन्न पाण्याने ते त्या पेरजागडावर राहिले.त्यांनी तिथलं सत्व अंगाशी बाळगलं.हर एक गुंफा,हर एक जंगलाची बाजू त्यांचा अभ्यास केला.

तिथे असलेल्या वास्तव्याची लोकांना जाण करून दिली.ते गड मायाळू आहे अशा पद्धतीने त्यांनी त्या गडाला सात बहिणीचे नाव दिले.त्या गडाविषयी त्यांनी एक महत्व सांगितलं होतं,जे आजही मला आठवते.ते गड माया लावते.कारण ज्या विचारांती आपण त्या गडावर पाऊल ठेवतो तेव्हा त्या विचारांना ते गड एकप्रकारे उत्साह देते.नवचैतन्य प्रदान करते.माया अजूनही तिथे जिवंत आहे याचं सत्य उदाहरण मी टोंगरे महाराजाकडून ऐकलं होतं. तसं आणखी मला बरेच काही त्यांना विचारायचं होतं पण वयाच्या बऱ्याच उतारामुळे त्यांना बहिरेपण आले होते.ज्यामुळे प्रत्येक वाक्य बोलताना त्यांच्या कानाला ऐकु जाईल अशा उंच स्वरूपात बोलावे लागायचे.त्यामुळे काही बोलायचे मी टाळून टाकले.

त्यांचे काही अनुभव पण मला ऐकायला मिळाले.त्यांनी ज्या शिष्याचा मला पत्ता दिला होता.त्यांची भेट घेतल्यानंतर मला कळलं की डब्बल सीट महाराजांना सायकलवर घेऊन जाताना कसे कसे डोंगर चढ चढल्या जायचे.पण थकवा अजिबात यायचा नाही.त्यामुळे टोंगरे महाराजांपासून सात बहिणींच्या गडाची उत्पत्ती झाली असे म्हणता येईल.निदान त्या वेळेस तरी मला असे वाटले होते.पण ज्या गोष्टींची मला गरज होती ती अद्याप त्यांच्याकडून

मला मिळाली नव्हती.कदाचित चार चौघांच्या वास्तव्यात त्यांनी सांगायचं टाळलं मला असेही म्हणता येईल.

महाराजांनी ज्या सात खोल्यांचा उल्लेख केला होता.ते एकमेव असे इसम होते ज्यांनी आत प्रवेश केला होता.कारण कालांतराने बारीक दगडांचे तुकडे टाकून ती खिंडच बंद करून घेतली होती.महाराजांवर माझा विश्वास नाही अश्यातला काहीही भाग नव्हता.पण त्यांनी टाळलं यासाठी म्हटलं की अजूनही बऱ्याचशा गोष्टी होत्या जा त्यांनी मला सांगितलेल्या नव्हत्या.आणि कालांतराने त्या दुसऱ्याकडून मला माहित झाल्या होत्या.कारण जेव्हा मी त्यांना माझं समाधान मागायला लागलो होतो तर त्यांनी मला पेरजागडावर जाण्यास सांगितलं होतं.

त्यांनी ज्या शिष्याचा मला पत्ता दिला होता.शुरुवातीच्या काळात तीच लोक ट्रस्टचे सदस्य, अध्यक्ष होते.त्यामुळे प्रत्येकाला स्वतःची एक ईर्षा एक अभिमान होता असं म्हणण्यास काही कारण नाही.कारण त्या वेळेस श्रम दानाने झालेली बरेचशी कामे आज पैशानेसुद्धा चांगल्या प्रमाणात होत नव्हती.ते नंतर मला कळलं.असे बरेच जण गावोगावी असणारे सहकार्य करायला तत्पर होते.पण प्रत्येकाला दिसणारा पैसा मनात वेगळे भाव निर्माण करतो

त्यापद्धतीने वादविवाद झाले.आणि त्यामुळे बऱ्याच लोकांनी तिथून माघार घेतला.ज्यामुळे सत्वाच्या जागेवर अहिंसा नांदू लागली.

आत्ताही जणू फारसा बदल झाला आहे असे नाही.कारण टोंगरे महाराज त्या गडाची शान होते.आणि ते गेल्यानंतर गड निकामा झाल्यासारखं झालं होतं.आजही ट्रस्ट आहे.नवीन अध्यक्ष,सदस्य बऱ्याच प्रमाणात येतात जातात.पण आज तो गड फक्त गड म्हणूनच आहे.जवळपास फॉरेस्ट अधिकाऱ्यांनी याचा फायदा घेत संपूर्ण गडच आपल्या ताब्यात घेतला.ज्यामुळे अशा पद्धतीने कित्येकांच्या श्रद्धेची लख्तरं उडून गेली आहेत.

माझ्यामते जगातील सत्व नाहीसे कधीच झाले नाही आहे.दगडाला शेंदूर माखला की देवपण येतो असे बरेच लोक म्हणतात.पण जर मनामध्ये श्रद्धा असेल,आस्था असेल,विश्वास असेल,एकाग्रता असेल,सहनशीलता असेल तर त्याला सत्व अगदी कुठेही मिळते.पण आजच्या युगात अध्यात्मच नामशेष झालय.त्यात विज्ञानाने त्याची जागा घेतली आहे. त्यामुळं परानोर्मल अक्टीव्हींटी सारखे विचार जागे होतात.जग तेव्हाही चालत होतं आणि आत्ताही चालत आहे पण जगण्यात इतका

बदल घडलाय की जगणारा स्वतःचेच आयुष्य कमी करून जगतोय.ज्यात त्याची स्वतःची चुकी आहे हे तो कदापि मान्य करणार नाही. असो ओघात आलं म्हणून लिहून टाकलं.

हे एक खरं आहे की विज्ञानाचा आधार घेणारीही बरीच मंडळी आहे.आणि या जगात नास्तिकांची काही कमी नाही. शोधलं तर देवपण मिळतो असे म्हणतात.पण त्या देवाला शोधणारे मात्र खूप कमी असतात. सोनापुर हे एक छोटंसं गाव आहे.पण जितकं छोटं आहे तितकंच चतुर आहे.राजकारणातला एक ठोकळा आहे हे मी मागेच सांगितलं आहे.पण गाव म्हटलं की वाईट आणि चांगली सत्ता असतेच.ज्या पक्षाचा माणूस वाईट असतो आपण त्या पक्षालाच शिवीगाळ करतो पण सांगायचं राहिलं तर पक्ष कोणताच वाईट नसतो.त्या पक्षात कार्यरत असणारेच पक्षाचं नाव घेऊन आणा भाकी करीत असतात.

ज्यावेळेस मी सोनापुरात दाखिल झालो होतो.त्याच्या काही वर्षा अगोदर एक सरपंच होता.ज्याच्या बऱ्याच तक्रारी असायच्या.आणि कित्येकांचं खाल्लं घेतलं अशातला भाग होता.त्यामुळे गावकऱ्यांनी त्याला पदावरून निलंबित केले.आणि याच कारणामुळे बऱ्याच प्रमाणात तो गावकऱ्यांवर डीवचला

होता.मग त्यासाठी त्याने राजकारणात प्रवेश घेतला.आणि गावातील बऱ्याच काही योजनांचा तुटवडा करू लागला.त्यामुळे सगळे त्याला पिसू म्हणायचे. पीसू म्हणजे ढेकूण...पिसाट सुटलेला.असे गावकरी आवर्जून म्हणायचे.आणि म्हणून गावात दोन पार्ट्यांची विभागणी झाली.

असे बरेच प्रकार होते ज्यात वाद व्हायचे.म्हणजे एक गाव दोन तुकडे अशा संदर्भात असलेले ते गाव.ज्या पक्षातला पाहुणा त्याच पक्षातल्या घरी जाईल.अशी कडक सुनावणी बाजी व्हायची.खरतर या बाबतीत मलाही काही माहीत नव्हते.पण जसजसं गावात मी जुनाट होऊ लागलो होतो.त्या पद्धतीने लोक मला ओळखू लागले होते.

पेरजागडावरून आल्यावर काकांशी जे बोललं होतं, ते बऱ्याच लोकांकडून ऐकलं होतं.पण ते तिथले मूळ रहिवासी आहेत आणि त्यांना काही वेगळं माहीत असेल म्हणून मी त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करत होतो. त्याच दिवशी वाटेत एक प्रवासी भेटला होता.अपक्ष असल्यामुळे त्याने जरा लांबूनच माझ्याशी बोलणे केले होते.सत्वावर तर त्याचाही विश्वास नव्हता.पण जेव्हढा हा

सात बहिणीचा गढ आहे.त्यावर त्याने एक कल्पना मात्र मांडून दाखवली...

त्याचं म्हणणं असं होतं की,कोलंबसने जसं अमेरिकेचा शोध लावला तसेच टोंगरे महाराजांनी या गडाचा शोध लावला.त्या काळी जंगलात जाऊन राहणे हे साधारण माणसाचे काम नव्हते.पण महाराज ठेंगणे आणि कृश असल्यामुळे कुठल्याही दगडांच्या गुन्फेमध्ये जाऊन लपत असत.कारण त्यांना समोर घडणाऱ्या भविष्याची माहिती होती.की काय कार्य केल्याने त्यांचं नाव जगाला कळेल?अशा तऱ्हेने त्यांनी बराच अभ्यास केला. गडाबद्दल एक खोटी रचना तडजोड केली.आणि त्यांच्या वास्तव्याला लोकांनी मान्यता दिल्यामुळे ती कल्पना लाखोंच्या मनात सत्यात उतरली.निसर्गाची देण असलेल्या त्या गडाला बऱ्यापैकी त्यांनी वारसान दिला.

मी बऱ्याच पद्धतीने त्याला विचारलं की असं वाटण्यामागे तुझा काही हेतू आहे की तू फक्त तुझे विचार मांडतोयस?यावर त्याला निरुत्तर होताना मला कळून आलं होतं की आता अपक्षाकडे बोलायला काहीच उरलं नाही.कारण त्याचा राग मला जास्त प्रमाणावर टोंगरे महाराजांकडे वळताना दिसला.तो माणूस आपल्या

अस्खलित बोलण्याने कित्येक लोकांना मंत्रमुग्ध करून टाकायचा.गडाची शुरुवात,लोकांचा विश्वास,त्यांचं श्रमदान अशा बऱ्याच गोष्टी त्याने केल्या.पण इथली देणगी खावून बसायचा असे त्याचे मत होते.

त्याच्या त्या बोलण्यावरून समजत होते की टोंगरे महाराजांविषयी त्याच्या मनात काय प्रतिक्रिया आहे ते.कारण जे महाराज इतके दिवस विना अन्न पाण्याने,विना सहकार्याने,विना आधाराने राहिले.त्यांना आता पैशाची गरज पडली.ते स्वार्थी झाले.खरतर ही एक विचार करण्याची गोष्ट होती.हे एक मात्र खरं होतं की सात बहिणीचे जे नाव त्या गडाला दिले होते ते काल्पनिक असू शकते,मात्र या बाबतीत विचार करायला काहीच हरकत नव्हती.

कारण दोनदा त्या गडावर जाऊन सुद्धा मला काहीच मिळाले नव्हते.फक्त तो अभास ज्यांचं ऐकण्याशिवाय काहीच अस्तित्व नव्हतं.ते मात्र एक कोडं होतं.पण मी निश्चय केला होता की त्या गडाचं काय रहस्य आहे हे मी जाणणारच? त्यासाठी मला कुठेही जावं लागेल तरी चालेल पण मी त्याचा शोध करीनच!!!

## १८)आयुष्यातला दुसरा वाघ आणि भ्रमंती...

सकाळी थोडं लांब जायचं आहे म्हणून मी थोडं लवकरच झोपून गेलो होतो.पण अंथरुणावर पडल्या फक्त डोळे मिटून होतो.कारण कानात गुंजणारे ते छम छम शेवटी काय होतं? हेच मला कळत नव्हते.कुणाला विचारावं म्हटलं तर काही वाईट समजतील या विचाराने मी कुणाला काही सांगितलं पण नव्हतं.आणि उद्या ज्या भागावर जाणार होतो.तो भाग नकाशात एक गुणाकार(खतरा) म्हणून दाखवला होता.लाल रंगाने रंगवलेला तो लखोटा म्हणजे नक्की काय होतं?उद्या मी तेच बघण्यासाठी चाललो होतो.जिथून माझी शुरुवात होती.

पण एक होतं.गडाच्या बाबतीत प्रत्येकजण वेगळाच बोलायचा.त्यामुळे खरं काय ते मला समजण्यासाठी थोडं अवघड वाटायचं.पण प्रयत्न करत होतो उद्या काहीतरी करायचं म्हणून.

सकाळी काकाने मला त्या इसमाशी ओळख करून दिली.ज्याला ते जंगल कानाकोपरा माहीत होतं.मधुकर त्याचे नाव...

काकाने सांगितल्याप्रमाणेच माझ्या आयुष्यात असणारा तो दुसरा वाघ होता.आणि त्याची ही उपमा, त्यासाठी एकदम बरोबरच होती.गावातून किंवा इतर बाजूंच्या गावातूनसुद्धा त्याच्या पराक्रमाबद्दल अगदी कुणीही सांगेल.अशी त्याची ख्याती होती. काळया सावळया रंगाचा,डोक्यावर काही विरळ केस,पायात चप्पल वापरणार नाही.असा थोड्या बऱ्याच वेगळया पद्धतीचा माणूस होता.जवळपास बारा ते तेरा किलोमीटरचा अतील प्रवास झाल्यानंतरही त्याला दम असा लागलेला नव्हता.

त्याला बघितलं की असं वाटायचं की तो माणूस कमी आणि पशू जास्त आहे. वाघाबरोबर बरेच युद्ध मी त्याचे ऐकले होते.आणि जंगलात त्याला वघाबरोबर जरी चालायला सांगितले तरी तो चालणार.जंगलातून चालताना प्रत्येक निशाण,प्रत्येक पाऊलाची ओळख तो इतक्या बारकाईने बघायचा, आणि नेमका सांगायचा.कि कोणता प्राणी आहे? आणि कोणत्या दिशेने गेलाय म्हणून?

जंगलातील प्रत्येक वनौषधींची त्याला माहिती होती.त्यामुळे स्वतःला आयुर्वेदाने त्याने अशा प्रमाणात सज्ज केले होते, की पन्नास पंचावन्न वयाचा असताना देखील वीस तीस वयाच्या तरुण

इसमासारख बळ होतं त्याच्च्यात.कोणत्या जागेत काय दडलंय?बऱ्याच प्रमाणात त्याची बुद्धी त्या जंगलाच्या बाबतीत तल्लख होती.कुठे थांबायचं नाहीच पण प्रत्येक निशाण अगदी निरखून बघायचा.आणि त्याच्या हातात असलेली कुऱ्हाड तो कधीच सोडायचा नाही.अगदी त्याच शस्त्र होतं ते जंगलात जाण्यासाठी.

गावात एक अलगद नातं होतं.आई वडील अगदी ठरवून सांगायचे. हा मामा होतो,तो काका होतो.तशाच प्रकारे जेव्हा त्या इसमाची भेट काकाने ठरवून दिली, तेव्हाच सांगितले की हा तुझा मामा होतो.त्यामुळे मधुमामा अशी माझी संगत छान प्रकारात रंगत होती.तरी त्यांची इच्छा मला जंगल दाखवण्यात नव्हती.आणि नुसतं फिरण्यासाठी तर अजिबात नाही.सगळ्यांसमोर त्याने मला म्हटलं की जंगलात फिरणे हे काही हायवेवरच्या रस्त्यावर फिरणे नव्हे.कुठे काय मिळेल?आणि कुठे काय होईल?याची जराशी सुद्धा जाणीव नसते.एक छोटीशी चूक सुद्धा माणसाचं जीव घेऊ शकते.

फॉरेस्ट ऑफिसर रोज विचारतात.जंगलात फिरायला मनाई केली आहे.जागोजागी ट्रॅप कॅमेरे लावले आहेत.जर तुला

फिरायचच असेल, तर निदान गावच्या सरपंचाशी तरी भेट घडव.जेणेकरून कुणाला काही त्रास नको.

एकंदरीत त्याचंही बोलणं मला फार प्रमाणात बरंच वाटलं, म्हणून त्यांना घेऊनच मी सरपंचाकडे भेट घ्यायला गेलो.

कोण? कुठून आला?कशाचे काम आहे? हे सगळे प्रश्न अपेक्षित होते.त्यामुळे त्या सगळ्याचा काहीच अर्थ नव्हता.आणि ज्या कारणासाठी मी इथे आलो होतो.ते कारण सांगणे मला गरजेचे वाटले नाही.त्यामुळे मी त्यांना जरा वेगळ्या पद्धतीने समजावले.जे समजायला त्यांना अवघड गेले नाही.

साहेब मी निसर्गाचा वेडा आहे.मला फिरायला फार आवडतं.अशा कित्येक जागी मी फिरून आलोय ज्याची तुम्हीसुद्धा पूर्तता केली नसेल.पण शेवटी विचार आला की आपण आपल्याच भागात शोध करूया. सातपुड्यावर जशी देवस्थाने बसली आहेत त्यासारखीच आपल्या पेरजागडावर पण आहेत.पण कित्येकांना त्याची जाण नाही.कित्येकांना त्याची कल्पना सुद्धा नाही.कारण आजपर्यंत त्याची खरी माहिती कुणी कुणाला दिलीच नाही.

शिवाय निसर्गाने वेढलेले हे सुंदर गड कित्येक पर्यटकांच्या डोळ्यांना लुभावतात.आणि वर हे गड फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये विलीन होत आहे.ज्या गडाला तुम्ही वाचवू शकत नाहीत.पुढे तुमचं गाव तिथे गेल्यास ते वाचवू शकणार काय?कारण तुमचं गावपण गेलंय जंगलाच्या सरहद्दीत.

असं बऱ्याच पद्धतीने मी त्यांना पटवून सांगितले.सोबतीला कोण आहे? वगैरे त्यांनी विचारले आणि म्हणाले...फिरून या तुम्ही..कारण तुमचं म्हणणं पण रास्त आहे.ज्यामुळे आम्ही बऱ्याच प्रमाणात डांबत चाललोय.तुम्हाला जी काही मदत लागली ती कळवा आम्हाला...आम्ही नक्कीच ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करू.त्यांच्या अशा बोलण्याने मधुमामाला पण शंकांचं निरसन झाल्यासारखं वाटलं.

त्यामुळे तिथून निघाल्यावर, त्यांनी फक्त केव्हा निघायचं? म्हणून विचारलं.आणि सोबतीला कुणीतरी माणूस पाहिजे म्हणून त्याच्या शोधार्थ निघून गेले.

तिथून तयारीला मी निघालो.मनामध्ये एक विचार घोळत होता, की आज आपण ज्या दिशेला जात होतो. त्या दिशेला शंखाची कलाकृती त्या नक्षावर दाखवली होती.आणि ते सगळं नजरेत असावं म्हणून मी मोबाईलचं मॅप ओपन करून चालत होतो.

मी,मधुकर मामाजी आणि आदल्या दिवशी पेरजागडावर भेटलेला एक धनगर, ज्याला पैसे देऊन मी सोबतीसाठी आणले होते.असे तिघेजण मजल दरमजल करीत निघालो. सोनापुर पासून जवळपास तीन किलोमीटर अशा अंतरावर एक सारंगड नावाचे छोटेसे गाव आहे.आमच्या प्रवासाचा हा पहिला टप्पा.जंगलात जाण्यासाठी आम्ही सोनापुरवरूनसुद्धा निघू शकत होतो.पण सारंगड पासून काही मजेशीर बघायला मिळणार आहे, असे मधुमामाजी म्हटल्यामुळे आम्हाला पायी पायी सारंगडला जावे लागले.तिथून पुन्हा अर्ध्या एक किलोमीटरच्या अंतरावरून, जंगलाची सरहद्द तयार होते.त्यावर आम्ही येऊन थांबलो.

सहज मधुकर मामाजीने सचेत करण्यासाठी मला जवळ बोलावलं आणि म्हणाले...

बघ पवन...तुला सांगतो ते नीट ऐक..इतर जंगल तू केव्हाही भटकंती केला असणार, यात काही शंका नाही..पण हे जंगल त्यापेक्षा वेगळं आहे.त्यामुळे मनात असलेली भिती आधी तू काढून टाक.कारण इथे ती चालत नाही.आणि पुन्हा एक महत्त्वाचं...इथे चालताना अंतर पाडू नकोस.नेहमी बरोबरच रहा...कारण वावटळ कधीही जो अंतरावर असते ना, त्यालाच आधी घेरते.आणि जमेल तितक्या शांतपणे आणि इशाऱ्याने चालायचं.जणू आपण जंगलातलेच पशू आहोत या पद्धतीने...

मी होकार दिला आणि सहज लक्ष पेरजागडाकडे टाकली. कारण आज आम्ही त्या पेरजागडाच्या उलट बाजूला होतो.मला वाटले इथून पेरजागडची ती निद्रेत असलेली छवी दिसणार नाही.पण जशी ती सोनापुरवरून दिसत होती.तसेच या जंगलातून पण ती दिसत होती.आणि जी भावाची डोंगर दरी बऱ्याच प्रमाणात विखुरलेली होती.तिचा तो काही खचलेला भाग ह्या बाजूने पण दिसत होता.अशा पद्धतीने तो भाग खचला होता की तिथे जणू एक भिंत तयार झाली होती.ज्याला गावकरी "पांढरी भिंत" असे म्हणतात.खास करून तिथे जंगली कबुतरांचे फार प्रमाणात वास्तव्य असते.

शेतात जाणारे कच्चे रस्ते सोडून आम्ही काही वेळानंतर जंगलातील आड मार्गाला लागलो.आमचे मार्गदर्शक सतत नवीन रस्ता दाखवत होते.कधी पायवाट, तर कधी पाणी वाहणारा कोरडा पाट.अशा पद्धतीने आम्ही त्यांच्या मागोमाग चालू लागलो होतो.काही वेळातच आजूबाजूला दिसणारी दूरवरची घरे, आणि शेतीवगैरे डोळयांसमोरून नामशेष झाली.ज्यामुळे आपण आता घनदाट अरण्यात आलो आहे याची जाणीव झाली.

जास्त प्रमाणात तिथे कुणी जात नसल्यामुळे बऱ्याच छोट्या छोट्या काटेरी वनस्पतींचे तिथे उत्पादन होते.आणि त्यामधून आम्हाला रस्ता काढत जावे लागत होते.जवळपास अर्ध्या एक तासानंतर दगडांची ती उतराई दिसू लागली.म्हणजे आता आपण डोंगर चढायला लागलो अशी त्यांची इशाऱ्याने माखलेली नजर दिसली. मध्यंतरीच ते थांबून वाघाची ताजी संडास,तर मोराच्या पायाचे ठसे,असे प्रत्येक निशाण समजावून सांगायचे.आणि तो पशू कोणता आहे? आणि कोणत्या दिशेने गेला?वर कोणत्या वेळेला तो इथे आला असेल याची हुबेहूब तो माहिती आम्हांस देत होते.

चालताना वाट नसलेली ती खडकाळ वाट आणि वर त्या काटेरी वनस्पतींचा त्रास. टी शर्टच्या छातीच्या भागापर्यंत ती

कपड्याला चिकटत होती.त्यामुळे प्रत्येक वेळा कपडे ओरबाळत राहावं लागायचं. आणि कुणी सहसा तिथे येत नसल्यामुळे वातावरण एकदम भयानक वाटत होतं.चालता चालता कितीतरी वेळा पायाखालची दगडे घरंगळत जायची.त्यामुळे सतत आपण पडतो की काय असा भास व्हायचा.आणि चालताना वाटपण नव्हती चालायला.त्यामुळे कित्येक वेळा उभे राहून कुठून जायचे हा विचार करत असायचो.

पण एक होतं.आम्ही चालत होतो, ते मधू मामजीच्या मार्गदर्शनाखाली.ते चालत असलेल्या वाटेवर.आणि ते सरळ चालत नव्हते.चालताना ते आडीमोडीचा वापर करत. खरंतर त्याचं कारण मी आधीच समजलो होतो, पण त्यांच्याकडून काही नवीन उत्तर मिळण्याच्या आशेने मी त्यांना विचारलं, की तुम्ही असे आडीमोडी का चालता? सरळ का नाही...?

त्यावर ते म्हणाले...याला म्हणतात श्रम वाचवणे.कारण डोंगराचा चढ भाग आपण जेव्हा सरळ चढतो तेव्हा आपल्या अंगातील सगळं श्रम संपून गेल्यागत होते.आणि जेव्हा आडीमोडी चालतो तेव्हा पायांना समान जमीन लागते.चढ असा वाटत

नाही.ज्यामुळे आपल्याला फार प्रमाणात श्रम होत नाही.आणि निरंतर चालण्याची शक्ती संचारत असते.

इतक्या महत्त्वाची गोष्ट ही त्यांनाही माहीत असेल असं मी गृहीत धरलं नव्हतं.कारण आपल्या पायांची पण एक फिलासापी असते.सपाट रस्त्याने चालताना संपूर्ण पाय हा जमिनीवर पडतो.त्यामुळे संपूर्ण शरीराचं ओझं अगदी सहजगत्या दोन्ही पायांवर पेलून असतं.पण दगडांची पायवाट किंवा चढ चढताना संपूर्ण भार आपल्या पायाच्या बोटाकडील भागाकडे जाते.ज्यामुळे पायाचा मागील भाग पोकळ होतो चालताना.ज्यामुळे आपले पाय बऱ्याच प्रमाणात वाकून येतात गुडघ्यातून.आणि दुखून येतात.जितक्या कमी वेळेचा प्रवास असतो तितकाच तो ठीक असतो, पण जास्त प्रवास हा अशा पद्धतीने केला तर बरं राहतो...

थोड्याच वेळात खालून बघावं तर डोंगराचा शिखर जरा जवळच आला होता.तिथे असलेल्या दऱ्याखोऱ्या अगदी काही अंतरावरच दिसत होत्या.पण वातावरणात कसलीतरी भयानक दुर्गंध येत होती.त्यामुळे जवळपास काय आहे?हे मी फार चांगल्या पद्धतीने जाणून घेतलं होतं.पण शेवटी विसरलोच होतो की आपणही एक वाघ आपल्या सोबत आणला होता.जो

त्यांच्यासारखाच अर्धाअधिक वेळ जंगलात घालवणाऱ्यापैकी होता.त्यामुळे काही अंतरावरच थांबून मी मधुमामाजीकडे बघत राहिलो.

जवळच एका सागवानाचे झाड उभे होते.ज्याच्या खाली त्याचीच एक वाळलेली फांदी पडलेली होती.मधूमामाने त्यापाशी येऊन त्याच्यावर कुऱ्हाडीच्या मागच्या बाजूने वार केले.ज्याचा ध्वनी जिथे तिथे कंपन पावत होता.जवळपास दोन ते तीन मिनिट तसे केल्यावर, अचानकच वातावरणात असलेली दुर्गंधी थोड्याफार प्रमाणात कमी झाली.समजून गेलो होतो की आता जायला मार्ग मोकळा आहे.

त्यानंतर मधूमामाने समोर चालण्यास शुरुवात केली. त्यांच्या मागोमाग मीसुद्धा चालण्यास शुरुवात केली.आणि सगळ्यात शेवटी होता तो धनगर.मग काही वेळातच आम्ही त्या शिखरावर पोचलो, तर नजरेच्या समोर एक प्रसन्न करणारे स्थळ होतं.

समोर दगडांत वसलेली एक प्रचंड गुंफा होती.जी दोन्ही बाजूंनी पोखरलेली होती.अगदी दोन दरवाजे असल्यासारखी.आणि आतमधून निरुंद होत, छोटी छोटी होत गेली

होती.त्या गुन्फेच्या मध्यंतर एक शिडी ठेवलेली होती.ज्यावर मधूमामाने मला चढण्यास सांगितले.आणि स्वतः सिगरेट पित त्या गुहेच्या तोंडाशी बसले.ते तिथून सांगत असले तरी पण वर चढायला मला भिती वाटत होती.पण शेवटी एक एक पायरी वर करत वर चढलो तर त्यावर आणखी एक गुंफा होती.मी जसा त्या गुंफेच्या जवळ आलो, तसेच वटवाघळांचा एक झोत अंगावर उडून आला.आणि परत मी घाबरलो.

मामाजीने सांगितल्यावर मग पुन्हा त्या गुंफेत आलो.वर त्या गुंफेत चढल्यावर समोरच एक मूर्ती होती.ज्याला मी नमस्कार केला आणि परत चालायला लागलो.पण एक नवल तिथेही वाटलाच, कारण या गडाच्या शिखरावरही पाणी होतंच.त्या मूर्तीच्या समोर पण ती गुंफा कमी होत गेली ज्यात वटवाघळे होती.आणि तिथून आपल्याला दगडांवर निस्तारत असलेले पाणी येताना दिसते.जे त्या मूर्तीवर अभिषेक केल्यागत टिपकताना दिसते.पण ज्या वेळेस मी तिथे गेलो त्यावेळेस पाणी थोडं कमी प्रमाणात होतं.

खाली उतरल्यावर मामाजीनेच सांगितलं की वरच्या गुंफेचं पाणी जेव्हा कमी होते, तेव्हा पाणी या डोंगराच्या आत जात असते.खाली जी गुंफा होती.ती गुंफा त्या डोंगराच्या फार आत जात

होती.रस्त्यावरून आतला काळोख दिसून पडत होता.त्या गुंफेत काही अंतर आत गेल्यावर पाण्याचं जलाशय आपल्याला दिसून येते.जे आपल्याला मोठ्या टॉर्च शिवाय बघायला मिळत नाही.त्या दगडांवर असलेली ती पाण्याची रचना अगदी अद्वितीय होती.खरतर मलाच माझ्या डोळ्यांवर विश्वास नसल्यासारखं होतं.

तिथून परतल्यावर मधूमामाने सांगितलं.की इथे नेहमी पट्टेदार वाघाचे वास्तव्य असते.हे बघ तो नुकताच गेलाय..(वाघाच्या काही निशाणाकडे बोट दाखवत मधूमामाजी म्हणाले.) तसं इथे दुर्गंधी फारच प्रमाणात होती.कारण जिकडे तिकडे जनावरांचे हाडे पसरली होती,वर त्या दगडांना बऱ्याच प्रकारचे भुयार होते ज्यात साळई असायची. साळई जंगलातील एक जीव आहे जी तिच्या अणकुचीदार काट्यांसाठी ओळखली जाते.ज्यामुळे सहसा तिची शिकार कुणी करीत नाही.पण त्या गुंफेत तिचे काटे मात्र खूप प्रमाणात होते.ज्यातून काही निवडक मी माझ्या संग्रही पकडले होते.

पण इतक्यात ते गड काही संपले नव्हते.परत त्याच गुन्फेच्या वर अजून एक गुंफा होती.ज्यावर त्या गडाचा मुख्य "महादेव" बसला होता.बाजूच्याच दगडांवरून चढून वरच्या गुन्फेवर जावे

लागते.ज्यामुळे बॅग वगैरे खालीच ठेवून मी त्यांच्या मागोमाग निघालो.त्या वरच्या गुंफेत एक दगड पुरलेला होता. गुन्फेच्या मधोमध.त्या संबंधी मी मामाजीला विचारलं तर ते सांगू लागले...

"ही मूर्ती म्हणजे त्या काळातील जुनाट महादेव आहे.ज्याची आजही बरेच लोक पूजा करतात."तो बघ त्रिशूळ आणि नारळाचे तुकडे...पलीकडे इशारा करत मधूमामाजी म्हणाले...

"मग ह्याला काही नाव असेल ना? आणि ह्या डोंगराला पण...?"

"या डोंगरांगेला "घोडपाक" असे नाव आहे.आणि या महादेवाला "बोंडा महादेव" असे म्हणतात.इथे सदोदित त्याचे वास्तव्य असते.त्या वास्तव्याला जपण्यासाठी नेहमी तो वाघ इथेच असतो.आपल्याला इथे यायचं असलं की सगळ्यात आधी त्याला सूचित करावं लागतं.अन्यथा त्याची भयावह डरकाळी स्वतःला भीतीनेच मारून टाकते.आणि जांगलाविषयी तर तुला माहीतच आहे."

त्या गुहेच्या बाहेरून मी सभोवतालचा परिसर बघितला तर पेरजागड इथून फार लांब दिसत होता.दाराशी झाडे असल्यामुळे बऱ्यापैकी आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते.आता फक्त सहवास होता जंगलाचा.त्यातील वन्य हिंस्त्र प्राण्याचा आणि माझ्या अनुत्तरित प्रश्नांचा.कारण मला जाणून घ्यायचं होतं, की काय दडलंय इथे.आत्ताशी हे एक कारण होतं.ज्याच्याशी माझा मला काहीच संबंध वाटला नाही.उलट माझ्यासाठी ते स्थळ प्रेक्षणीय झालं होतं...

## १९) घोडपाक आणि सातधारा...

जाताना मी त्या धनगराला पैसे देऊन आणले होते.त्याला जेव्हा मी या प्रवासासाठी बोललो होतो तेव्हा तो उद्धटपणे मला म्हणाला होता...की अख्खं जंगल मी कितीदा फिरून घेतला आहे.इथला प्रत्येक कोपरा न कोपरा मला माहित आहे.असे तो सांगत होता.पण तो हे विसरला होता की शितावरून भाताची परीक्षा होते.तसेच ह्या एका स्थळावरच आल्यावर मी त्याला ओळखलं होतं.आणि मधूमामाला तसं सांगितलं होतं.त्यामुळे जाताना त्याची फार प्रमाणात मजा घ्यायची त्यांनी ठरवले होते.

त्या अद्भुत गडाची भेट घेतल्यानंतर मी आणि मामाजी व तो धनगर पुढच्या प्रवासासाठी निघालो.कारण उतरताना तिच काटेरी दगडांची घरंगळती पायवाट पार करून जायचे होते.त्यामुळे तेच चिकाराचे उद्गार ओठावर आले.जर अजून समोर हाच काटेरी प्रवास जरी असता, तर नक्कीच नाकी नऊ आले असते चालायला.असा खोडसट विचार करून नाक मुरडत चालत राहिलो.फक्त केव्हा ही वाट संपते याचा विचार करत.

घोडपाकच्या डोंगरावरून उतरल्यावर आम्ही सरळ त्या जंगलामधून घुसलो.पण इतक्यात पुन्हा एक गम्मत झाली होती.माणसाला जशी बुद्धी असते त्याचा वापरही तो रोजच्या व्यवहारात करत असतो.त्याचप्रमाणे पशु पण करतात.प्रत्येक सरहद्दीवर फॉरेस्ट अधिकाऱ्याने ट्रॅप कॅमेरे लावले होते.पण बघा ना त्या वाघाची कमाल!!! तो वाघ सुद्धा किती चलाख होता.त्या कॅमेऱ्याच्या समोरून न जाता मागाहून तो जायचा. त्यामुळं आम्ही पण वाघाच्याच पावलांचा माग काढत कॅमेऱ्याच्या मागाहून गेलो.

अंतरा अंतरावर थांबून आमचे मार्गदर्शक मधुकरजी प्रत्येक झाडाची तसेच रोपट्याची माहिती देत होते.कोणत्या रोगावर कोणत्या झाडाची पाने आपल्याला कामी येतील?कोणती मुळे कामी येतील?तसेच विविध पावलांचे ठसे,कोणत्या जनावरांचे आहेत?ते सुद्धा सांगत असत.जनावरांच्या प्रजाती,तसेच झाडांच्या प्रजाती यांचे बहुमूल्य असे महत्त्व ते सांगत चालले होते.

मी असे कितीतरी जंगल फिरलो होतो.पण या जंगलात फिरताना एक प्रकारचं भयाण वातावरण मनामध्ये संचारत होतं. मार्गदर्शना शिवाय मी तर फिरू शकलो नसतोच पण जंगलातून कधी परतही आलो नसतो.कारण चारही बाजूला घनदाट असे

जंगल पसरले होते.कोणतीच डोंगरी अशी आता डोळयासमोर दिसत नव्हती.जिथे तिथे शिकार केल्याची किंवा शिकार झाल्याची खूण जमिनीवर दिसायची.कुठे कुठे हाडांचे सापळे असायचे.ज्यामुळे काही वेळा हृदय स्पंदन तीव्र होऊन जायचे.

जवळपास दोन ते तीन किलोमीटर चालून गेल्यावर एक पाण्याचे स्त्रोत आढळले.शासनाने जंगली पशुंसाठी जंगलात कित्येक जागी असे पाण्याचे स्त्रोत खोदून ठेवले होते.ज्यामुळे उन्हाळयाच्या पहिल्या ते दुसऱ्या महिन्यापर्यंत त्यात पाणी साचून असायचे.जंगली पशूंना त्यामुळे फारश्या प्रमाणात वणवण करावी लागत नसे.पण शिकारीसाठी अलीकडे माणसांचाही त्यात शिरकाव होऊ लागला होता.बरेच सापळे रचले असायचे त्यावेळी.पण अलीकडे जंगल संवर्धन कडक शिस्तीत असल्यामुळे फारसा शिरकाव नव्हताच.पण ओलसर चिखलात मानवाच्या पायाच्या आकृत्या उमटल्या होत्याच.

मधुकरमामाजी कसले तरी निरीक्षण करीत गोलाकार फिरत होते.तेव्हढीच सवड लक्षात घेऊन मी पाणी प्यायला बसलो.तितक्यात मधुमामाने हाक मारली.ते त्या चिखलाच्या तळाशी असलेल्या पायांच्या ठस्यांकडे बोट दाखवत म्हणाले...

हे कशाच्या पायाचे ठसे आहेत?

माहीत नाही मामाजी...तुम्हीच सांगा!!!

हे सांबराच्या पायाचे निशाण आहेत.आणि आपण यायच्या अगदी काही वेळापूर्वी, ती इथून पाणी पिऊन निघून गेली आहेत.तुझ्या मते सांग बरं किती सांबरे असतील?

ते मला कसे सांगता येणार? तुम्हीच सांगा...

एकूण सहा सांबरे आहेत.आणि सोबत एक नुकताच जन्मलेला छोटासा कोकरू आहे...बघायचं आहे का?

मी आजूबाजूला बघितलं.त्या घनदाट अरण्याच्या पलीकडे काहीच दिसत नव्हते.जिकडे बघावे तिकडे फक्त दाट झाडी दिसत होती.आणि ती सांबरे नेमकी कोणत्या दिशेला गेली असतील हे मला कसं सांगता येणार होतं.म्हणून मग म्हटलं..मामाजी ती आता खूप लांब गेली असतील.आणि कोणत्या दिशेला गेली असतील हे आपल्याला थोडेच माहीत आहे.उगाच वेळ हरवण्यात काही अर्थ नाही.

अरे काही वेळ जात नाही,जवळच आहेत.फक्त तू ये मागोमाग..

असे म्हणत कोपऱ्यातून असलेल्या झाडीतून त्यांनी मार्ग काढायला शुरुवात केली.अगदी कशाचाही आवाज न होऊ देता गुपचूप यायला सांगितलं.काहीसे अंतर चालून जाताच त्यांनी मला तिकडे बघायला सांगितले..तर खरंच मोजून सहा सांबरे तिथे निवांत रवंथ करत बसली होती.आणि तो छोटासा बछडा आपल्या मातेच्या अंगावर खेळत बागडत होता.डोक्यावर शिंग असलेला सांबर इकडे तिकडे बघुन चाहुलेचा उसासा घेत सज्ज होता.अचानक पायाच्या खाली वाळलेल्या पानाचा चुररर....असा आवाज झाला.तशी ती सगळी सांबरे जंगलाच्या आत पळून गेली.

मी मधुकर मामाजीच्या त्या अचूक नेमबाजीचा कौतुक करत राहिलो. त्यांचं एक विशिष्ट गम्मत करण्याचा एक पैलू होता.एखाद्या झाडाचा त्यांना नाव माहीत असेल, तरी ते आपल्याला विचारतात.मग माहीत असले तर ठीक अन्यथा स्वतःच नाव सांगत आणि म्हणत..मलाही काही माहीत नाही, लोक म्हणतात म्हणून मीही म्हणतो.त्यांच्या प्रत्येक नाहीच्या

बोलण्यात हो दडलेला असतो. असं त्यांची गम्मत करण्याची पद्धत बऱ्याच वेळा नवीन माणसाला कोड्यात पाडणारी होती.त्यामुळे काहीवेळा जेव्हा ते रस्ता चुकत असल्याची गोष्ट बोलायचे.तर मला माझं जीव गेल्यासारखं वाटायचं.म्हणून त्यांचं बोलणं शक्यतो मी टाळून द्यायचो.

अजून जवळपास दीड ते दोन किलोमीटर अंतर चालून गेल्यावर एक विस्तीर्ण असा वृक्ष समोर आला.ज्याला पंधरा ते वीस फुटापर्यंत ओरबाळले होते.त्या झाडाची साल रक्ताप्रमाणे अशी लाल लाल होती.मधू मामा जीला त्याचे नाव विचारलं असता त्यांनी "रकत रोहन" असे त्याचे नाव सांगितले.

त्या झाडाकडे बघुन असं प्रतीत होत होतं.की जसं एखादं पाखरू स्वतःचं शरीर आतून सोयीस्कर राहावं म्हणून मातीचे कण गिळंकृत करतात.त्याचप्रमाणे जंगलातील बरेचसे प्राणी त्या झाडाची साल खातात.आपल्या आयुर्वेदातही त्याचा बऱ्याच प्रमाणात उपयोग केला जातो.असे मधू मामाजी सांगत होते.जमिनीपासून प्रचंड व्याप घेतलेला, वरच्या बाजूने इतस्ततः विशाल प्रमाणात तो वृक्ष पसरलेला होता.वाघ, बिबट वगैरे बऱ्याच

प्रमाणात त्या झाडावर चढत असल्यामुळे त्यांच्या पायांच्या नखांचे ओरखडे अगदी स्पष्टपणे दिसत होते.

काही अंतरावरच तिथून एक विशाल रानम्हैस मरून पडली होती.तिच्या शरीराच्या प्रत्येक अवयवाची हाडे अगदी स्वच्छपणे तिथे पसरली होती.कारण ते मृत झाल्याबरोबर इतक्या कमी वेळात अन्य पशूंच्या आहारात सामील झाले होते, की तिच्या शिंगाचे आवरण सुद्धा अजूनपर्यंत गळले नव्हते.

अशा बऱ्याच प्रसंगांना तोंड देत शेवटी त्या ओढ्यापर्यंत आलो.ज्याचे आम्हाला दर्शन घ्यायचे होते.पण आतमध्ये असणारा ओढाही इतका अद्वितीय वाटत होता की खरंच.कारण त्या ओढ्यात सगळी काळसर रंगाची दगडे होती.इतकी की त्यामध्ये रेतीचा कणसुद्धा पाण्याच्या प्रवाहाने वाहत असेल असे मला वाटत नव्हते.नुसत्या दगडांवरून तो ओढा वाहत होता.

समोर थोड्याच अंतरावर मधुकर मामाजी चकाकले आणि तिथेच थांबले.जमिनीकडे निरखून बघू लागले.त्यांना तसं बघुन मी समजून गेलो की त्यांना काहीतरी मिळाले आहे.कारण वाट

चालताना सहसा ते थांबत नव्हते.कारण आम्ही थकून जायचो तरी ते मात्र थकत नव्हते.त्या धनगराला त्यांनी विचारले..

"काय आहे रे हे?"

आणि तेव्हढ्या जागेला त्यांनी कुऱ्हाडी च्या दांड्याने गोल वर्तुळ केला.

"अरे हे झाडावरचे वानर असेल..लघवी करून गेले असेल."

"धनगर असून तुला माहीत नाही.वर सांगतोस की जंगल म्हणजे तुझ्या बाचं आवास आहे म्हणून... बरं तुला तरी माहीत आहे का पवन?"

"नाही मला पण नाही माहीत?"

अरे ही वाघाची लघवी आहे.वाघ स्वतःचा एक क्षेत्र घोषित करतो.तो जिथे लघवी करतो तिथून त्याची सरहद्द चालू होते.आपण ज्या भागातून चालून आलोय तो सगळा भाग ह्या वाघाच्या तावडीत आहे.इथे त्याची सीमा संपली.आणि दुसरा वाघ कधीच त्याच्या भागात प्रवेश करत नाही.अन्यथा फार मोठी झुंज होते.

प्राण्यांचा पण काय काय नियम असतो?हे आज मला कळत होतं.शेवटी राजाच तो जंगलाचा.त्याला तर अख्खं जंगलच दान होतं.परत त्याच्या काही अंतरा समोर एक खवल्या मांजर उभा होता.आम्हाला बघताच घाई घाईने तो पळून गेला.आणि जंगलात दिसेनासा झाला.

त्या ओलसर वाळूला हातात घेत मधूमामाजी म्हणाले..वाळू ओलीच आहे.याचा अर्थ वाघ आपल्या समोर समोरच होता.आणि नुकताच इथून गेलाय.नक्कीच तो आपल्या आसपासच आहे.त्यामुळे जरा सांभाळून चला.

त्यांनी तसं म्हटल्यावर सतत माझी लक्ष चोहोबाजूला राहायला लागली होती.त्यामुळे वावटळीने पडलेले झाड जरी असेल तरी त्याच्या आडोश्याला तर काही नाही ना!!! अशा तऱ्हेने मी जरा वाकून बघायचो.नुसती सडसड जरी ऐकु आली ना तरी हृदय धकधक करून जायचं.कारण वाघाची शिकार करण्याची पद्धत जरा अजीब आहे.वाघ आयुष्यात कधीच समोरून शिकार करीत नाही.त्यासाठी तो आसपास दबा धरून बसून राहतो. काळ आणि वेळ या दोन गोष्टींच्या आधाराने मागाहून तो झेप

घेतो.त्याच्या पायात अशी एक विशिष्ट कला आहे की नखे शरीराच्या आतल्या भागात खेचून पायातलं तळ मांस फुगवून घेतो.ज्यामुळे पाला पाचोळयावर चालत असताना देखील आवाज होऊ देत नाही.

अशा तऱ्हेने अर्ध्या किलोमीटरच्या अंतरावरच आता थांबायचे आहे अशा पद्धतीने आम्ही जरा जलद गतीने चालू लागलो.जंगलात सपाट भाग संपून आता डोंगर चढ लागला होता.झाडांची संख्या विरळ होऊन बांबूच्या बनांची संख्या वाढली होती.त्यामुळे अलगद रस्ता काढत आम्ही चाललो होतो. पेरजागडावर तरी जाणारे बरेचशे लोक होते पण इथे कदाचितच कुणी येणारा होता.पण तरीही बऱ्याच जागी दगडांचे खोरे तयार झाले होते.आणि दगडांच्या त्या खोऱ्यात जास्त करून अस्वल राहायची.किंवा साळई असायची.

साळईच घरटं म्हणजे अगदी दुतर्फा असतं.ती जिथे असते ना तिथून अगदी दोन ते तीन जायचे रस्ते तयार करते.पण तीचं येणं जाणं मात्र एकाच रस्त्याने असते.ज्या रस्त्याने तिला भीती जाणवते.तसच ती रस्ता बदलवून टाकते.अशा बऱ्याच कप्प्या तिथे

होत्या.चालताना त्यांचे अणकुचीदार काटे इतस्ततः पसरलेले दिसायचे.

येत्या काही वेळातच आपण उंचच उंच जात असल्याचा भास झाला तेव्हा कळलं, की आपण सातधाराच्या जवळपास आलो आहे.आणि दुरूनच एक कोरडी धारा नजरेच्या समोर आली.पाणी केव्हाचच वाहणं बंद झालं होतं.पण ती कोरडी खडकाळ धारा तेव्हाही बघण्यास अद्वितीय होती.आणि आत्ताच ती बघण्यात इतकी अद्वितीय होती तर पावसाळ्यात तर त्यापेक्षाही प्रेक्षणीय असेल यात काही शंका नाही.कारण त्या धबधब्याची रचनाच तशी सुंदर होती.अगदी पूर्ण जंगल उंचावरून स्पष्टपणे दिसून यायचं.

पावसाळी दिवसांत अगदी सातत्याने वाहत असल्याने गावकऱ्यांनी तिला "सातधारा"असे नाव दिले आहे.पुढे येऊन जंगलातून वाहत ती सारंगडच्या तलावाला जाऊन भेटते.मुक्ताईच्या डोंगरावरून ती उगम पावते.जिथे समोर तिच्या दोन वाहिन्या होतात.एक वाहिनी मुक्ताईच्या स्थळावर जाते.जे आजतागायत ठरलेलं एक पर्यटक स्थान आहे.आणि ही सातधारा म्हणजे त्याची दुसरी वहिनी आहे.घनदाट अश्या जंगलामध्ये असल्यामुळे त्या धबधब्याचा आस्वाद कुणाला घेता येत नाही.पण

तरीही मुक्ताईला असलेला धबधबा विदर्भात बऱ्याच लोकांना माहीत नसल्यामुळे सातधारा तर बऱ्याच लोकांच्या ओठी एक नवंच नाव जाहीर होत असते.

इथे कसं बऱ्याच गोष्टीत काही तथ्य होते.आम्ही गेलो तेव्हा सातधारा कोरडीच होती.पण तरीही तिची संरचना अगदी प्रेक्षणीय अशी वाटत होती.त्यामुळे धबधब्याच्या खाली जाऊन त्याचं चित्रफीत घेण्याचं मोह आवरत नव्हतं...

सतत पाण्याच्या धारेने दगडांची घळई झाली होती.ज्याचा आधार घेत मी खाली खाली उतरत चाललो होतो.जवळपास पंचवीस ते तीस फुटाची नऊ ते दहा मीटरची ती पायवाट होती.पाण्याच्या धारेने तयार झालेल्या शिड्यांवर पाय ठेवत मी खालच्या बाजूला उतरलो.माझ्या सोबतीलाच मागे मागे मधुकरमामाजी होते.खाली उतरत असताना उजव्या बाजूला असलेल्या झाडीतून अचानक सळसळ सळसळ असा आवाज येऊ लागला.

मी घाबरणार हे निश्चितच होते.त्यामुळे मामाजीच खाली आले.आणि ज्या बाजूला तो सळसळण्याचा आवाज येत

होता.तिकडे टक लावून बसले.लक्ष समोर जंगलात असताना एका हाताने सिगरेट पित बसले.माझ्याच्याने खाली राहवेना.त्यामुळे परत मी वरच्या बाजूला मध्यंतरी जाऊन बसलो.काही वेळाने तो आवाज थांबला.कदाचित ते एखाद्या सापाचं फडफडण असावं असे समजून ते माझ्याकडे वळले, पण मी होतो कुठे?

अरे मी इथे वाट बघतोय? आणि तू वर महादेव जाऊन बसलास!!!ये खाली ये...फोटो घ्यायची ना तुला...असे ते ओरडले...

तरी थोड्याफार पद्धतीने घाबरतच मी खाली खाली येत होतो.मग परत आजूबाजूला एक नजर फिरवली आणि हळूहळू घाबरत मी जंगलात समोर जाऊ लागलो.मधूमामाजी सारखे भिऊ नकोस म्हणून ओरडत होते.तरीपण माझी लक्ष ही वारंवार जंगलातच जायची.मग समोर असलेल्या दगडावर उभा होऊन मी त्या धबधब्याच्या संरचनेकडे बघू लागलो.आणि कॅमेरा काढून तसं टिपू लागलो.

अचानक काहीतरी दिसल्याचे मला भासले.नुकतेच काढलेले फोटोज् मी परत कॅमेऱ्यात झूम करून बघू लागलो.आणि समोर

डोळ्यांसमोर ही मी ते बघू लागलो.पाण्याच्या वाहिनीने दगडांवरून जाऊन जाऊन पार्श्वभागावर एक काळपट रंग तयार झालं होतं.जवळून बघितल्यावर त्यात असं काहीच वाटत नव्हतं.पण दुरून बघितल्यावर असं कळत होतं, असं दिसत होतं की अंधाराच्या साम्राज्याला धरून एका स्त्रीची सावली तिथे उभी आहे. तसं मी धबधब्यावर चढल्यावर सगळ्यांना सांगितले सुद्धा.

निसर्गाचं बहुमूल्य वर्णन या जंगलाला कित्येक जागी आहे. असं दिसून येत होतं.पण अचानक लक्षात आलं आणि मी मोबाईलचं मॅप ओपन केलं पण नेटवर्कच्या कमतरतेमुळे मॅपवर निश्चित जागा येत नव्हती.त्यानंतर तिथून आम्ही त्या धबधब्याच्या आधारे थोडं सामोरी चालत गेलो.इतक्या उंचावर पाणी मिळेल यात काही शंका वाटत नव्हती.आणि कोरड्या पडलेल्या त्या धबधब्याकडे पाहून तर कुणालाही तेच वाटले असते.

पण समोर काही अंतरावर काही काही हिरवं हिरवं गवत होतं.म्हणजे इतक्यात पाणी आहे म्हणून मला आशा वाटली.कारण माझ्या पण पाण्याच्या बॉटल्स केव्हाच रिकाम्या झाल्या होत्या.पण मधू मामजीला माहीत होते.वारंवार ते त्या धनगराची मजा घेत होते की तू धनगर आहेस ना..या जंगलातला कोपरा न कोपरा तुला

माहित आहे ना...मग प्यायला पाणी कुठे मिळेल..हे सुद्धा तुला माहीतच असेल ना...

प्रवासात बऱ्यापैकी गमती होतात.एक गम्मत असते.कुणाच्या तरी नावाने जेव्हा काही गोष्टी ओघात येतात.तेव्हा तो एक विषय होतो.आणि मग त्याच रागात मध्येच एखादा शब्द म्हणून त्याला आणखी डीवचायचं..आणि मग शेवटपर्यंत त्याला विनवत राहायचं ही एक गम्मत होती.कारण त्या धनगराच्या बाबतीत नेमकी ही एकच गोष्ट चुकली होती, की अभिमानाने तो आंधळा झाला होता.पण एखाद्याचं जीवन जेव्हा आपल्यावर निर्धारित होऊन जाते तेव्हा अभिमान धरून चालत नाही.आणि जर कुणी त्यावर विश्वास ठेवून जर जंगलात गेला असता तर नक्कीच जिवानिशी ठार मारल्या गेला असता.म्हणून मधूमामाजी सारखे त्याच्यावर खेकसत असत.

ती दोन मिनिटांचीच गम्मत असायची पण धनगर पार रागाने लाल व्हायचा.शेवटी मधू मामाजी असे सामोरी गेले आणि त्या हिरव्या कुरणांपाशी जाऊन थांबले.मागोमाग मग आम्ही पण तिथे आलो.

तिथे एका दगडांच्या खाली जेमतेम दोन फुटांवरून स्वच्छ आणि सुंदर असे जल साठले होते.जवळच कित्येक जनावरांचे ठसे होते.म्हणजे जनावरांना पण ते माहिती असण्याची चिन्ह होती.दगडाच्या एका छोट्याश्या कप्पीतून तो पाण्याचा प्रवाह होता.अद्भुत होतं ते...कारण डोंगराच्या माथ्यावर हा प्रवाह असणे अगदीच अद्वितीय होतं.जवळपास धबधबा कोरडा पडला आहे आणि इथे मात्र पाणी साचलं आहे.मधू मामाजींनी पाणी पिण्यासाठी जवळच्या पानांची एक ओंजळ बनवली.आणि त्या गोड पाण्याचा आस्वाद घेऊन आम्ही पुढच्या तयारीला लागलो.

डोंगराच्या त्याच उतार भागाला एक छोटासा नाला आहे.त्या नाल्याच्या पडवीत म्हणजे काठाच्या आतील भागात एक मूर्ती स्थापित होती.ज्याला " चुधऱ्यांचा महादेव" असे संबोधतात.आणि त्याच डोंगर उताराला जिथे ते डोंगर संपते तिथेच एका झाडाला टेकून असलेले "कोलामदेव" दिसतात.म्हणजे त्या महादेवा प्रमाणेच एक दगड त्या झाडाला चिकटवलेला आहे.ज्याला "कोलामदेव" या नावाने ओळखले जाते.

"कोलामदेव" हा शेवटचा टप्पा होता. तसं या जंगलातून तो शेवटचा नव्हता.कारण सातधारा ओलांडून आपण मुक्ताईला पण

जाऊ शकत होतो.पण आता वेळ फारच कमी होती.आणि चालून चालून आता पाय पण दुखायला लागले होते.त्यामुळे आम्ही परतीचा प्रवास शुरु केला.

## २०)नव्या गोष्टींची माहिती आणि भ्रमंती...

आपण बघतो की मृगाची पहिली सरी जेव्हा भूमीवर ओझरते तेव्हा त्या मृदेचा सुगंध अगदी हवाहवासा वाटतो. असं वाटते की मुठभर माती घेऊन त्याचा बक्का मारावा. तशाचप्रकारे जंगलातील काही वन्यप्राणी पण माती खातात.भर जंगलात बराचसा मैदान पायाखाली आला होता.आणि मधूमामांना  विचारल्यावर ते म्हणाले... इथे सांबरांची पलटण असते माती खायला...

यावेळेस चालताना एक आनंद मनात येत होता.जवळपास माझा मॅप बंद होता पण जंगलातील काही आकृत्या मात्र मी बारकाईने टिपल्या होत्या.ज्याचा उलगडा मात्र मला या काही दिवसांतच करायचं होतं.

जाताना जसे आम्ही थांबत थांबत जात होतो.तसेच परतीच्या प्रवासाला आम्ही न थांबता चालत होतो.आम्ही दोघेही त्या चालण्यामूळे थकलो होतो.ज्यामुळे प्रत्येकाच्या तोंडून एकही शब्द निघत नव्हते.फक्त थकले नव्हते ते मधू मामाजी.तिच लांब लांब पाऊले, तीच शोधक नजर,आणि तीच कुऱ्हाडीची घट्ट पकड व तो सिगरेटचा उग्र दर्प.

यावेळेस चालताना शेवटचे दोन तास उरले होते आणि आम्ही सारंगडच्या तलावाजवळ येऊन पोहचलो होतो.एक नीलगाय तिथे पाणी पिण्यासाठी थांबली होती.जरा हळूच मी तिचं फोटो काढण्यासाठी सामोरी गेलो आणि ती पळून गेली.

जंगलातील वन्य प्राणी आपल्या सारखेच भित्रे असतात. जसं आपण जंगलात जायला भितो तसेच ते गावात यायला भितात.जरासा सुगावा त्यांच्या पायांची हालचाल चालू करतो.आणि तसं ते विस्तीर्ण तलाव त्या जंगलाला लागून असल्यामुळे बऱ्याच प्रमाणात जनावरे तिथे पाणी पिण्यासाठी येत असतात.

शासनाने लावलेल्या बऱ्याच ट्रॅप कॅमेऱ्याच्या मदतीने होणाऱ्या शिकारी जरा विसावल्याच्या स्वरूपात दिसत होत्या.पण माणसासारखे जनावर मात्र अख्खं जंगल शोधून मिळणार नाही.तिथेच तलावाच्या बाजूला एक छोटासा ससा काही शिकाऱ्यांनी मिळून भाजून खाल्लं होतं.

तलावाचा तो विस्तीर्ण भाग पार करत आम्ही सोनापुरच्या दिशेनं निघालो.दिवस आता नुकताच असेल ओसरू लागला होता.मागे वळून बघितलं तर तितक्यात अंधाराची छाया हळूहळू पसरत येताना दिसत होती.पण संध्याकाळ व्हायच्या आत त्या मधू मामाने आम्हाला गावात आणून हजर केलं होतं..

आजचा संपूर्ण दिवस जंगलाच्या त्या सौंदर्याने बहरलेला होता. अलोउकिक टिपलेल्या त्या छायाचित्रांमुळे झालेल्या त्या साक्षात्कारांचा अजूनही विचार मनात घोळतच होता.आणि मी ठरवल्याप्रमाणे असली बरीच विधाने इथे दडलेली आहेत ते कळलं.कारण येताना काही एक दोन दगडे आणली होती.ज्यात अभ्रक आणि लोह यांचा समावेश मला दिसून आला होता.आणि नक्कीच आपण आता काहीतरी गाठणारच आहोत अशा पद्धतीने मी स्वखुशीने घराचा पल्ला गाठला.

रोजच्यासारखंच काकूने आज पण अंगणात शेकोटी पेटवली होती.ज्यामुळे हात पाय धुवून मी त्या शेकोटीच्या उबदार आगेभोवती जाऊन बसलो.सहज झालेल्या गमती जमती काकांना वगैरे सांगू लागलो.

गावखेडयात कसं असतं? आजही रात्रीला शेकोटी पेटवली की घराघरातली माणसे एकत्र येऊन बसतात.त्यामुळे आजूबाजूचे बरेच गृहस्थ येऊन बसायचे.मी त्यांना नवीन दिसलो की कोण? कुठला?चौकशी करायचे.आणि त्यांच्या मनात पेरजागडविषयी काय ख्याती आहे? ते प्रगट करायचे.पण त्या दिवशी जरा वेगळयाच गप्पा रंगल्या होत्या.इतक्या खोल होत्या की मला काय समजायचे होते ते कळून गेले होते.

चर्चा त्याच रंगल्या होत्या की गडावर सात खोल्या आहेत.आतमध्ये एक विस्तीर्ण तलाव आहे.भरपूर प्रमाणात त्यात खजिना दडला आहे.कित्येकांनी तो खजिना काढण्याचा प्रयत्न केला, पण सगळे जिवानिशी मुकले आहेत.या सगळया गोष्टी ऐकून मी केव्हाच मन मोडलं होतं.पण आज एक नवीन गोष्ट माहीती झाली.की त्याच गडाच्या पायथ्याशी हत्तीखोयाळ म्हणून मी मागे सांगितले आहे.त्या खाईतून आतमध्ये जाण्याचा एक विस्तीर्ण भाग आहे.ज्यात बावन्न खोल्या आहेत अशी कुजबूज चालू होती.त्यातील एक गृहस्थ म्हणाला...

अरे ते सत्वाचे काम आहे.प्रत्येकाला तो मार्ग मिळत नाही.खजिन्याच्या तर राशी पडल्या आहेत तिथे.पण गुप्ती महादेव

आहे ना.. तो असाच जाऊ देणार काय कोणाला?आणि शेवटच्या खोलीत म्हणतात सोनेरी रंगाचा पाळणा आहे.ज्याला एक भयानक भुजंग हलवत असतो.पण ते सत्वाचे काम आहे.तिथे आमच्यासारखा कुणी जायचा नाही कधी.जो निर्मळ आहे,सात्विक आहे,ज्याला दैवावर विश्वास आहे,अनुभूती आहे त्यालाच तो मार्ग सापडतो आणि फक्त तोच त्या बावन्न खोल्या उघड्या डोळयांनी बघू शकतो.आमच्यासारखे नाही...

ऐकून जरा ते विचित्र वाटलं पण अजूनही त्यांच्या गप्पा चालूच होत्या.आणि मी फक्त गप्प राहून ते ऐकण्याचा प्रयत्न करत होतो.कारण न विचारता मी बरंच काही गोष्टी जाणून घेऊ शकत होतो.त्यावर पुन्हा एक गृहस्थ म्हणाला...

अरे ते तर काहीच नाही...आमच्या वेळेला पण एक गोष्ट घडली.त्या रात्री आम्ही चौघेही शिकारीला होतो.तरी जवळपास त्या वेळात आम्ही पंधरा पंधरा माणसे शिकारीला जायचो.एक सांबर मारला तरी स्वतःला संपणार नाही इतकं मांस वाटोप व्हायचं.तिथे सगळे जंगलभर वेगवेगळ्या ठिकाणी राहायचे.आत्ता एक इथे बसून आहे तर दुसरा किलोमीटरच्या अंतरावर

असेल.हत्यार धरून तयारीत असायचं.कुत्रे पण त्यावेळेस साथीला अगदी मजबूत असायचे.

चरण्याने दोन मोठ्या मोठ्या साळया बघितल्या.आणि त्यांच्या मागे धावू लागला.अधून मधून जिवाच्या आकांताने त्या साळया अणकुचीदार काटे एखाद्या सळसळत्या तिराप्रमाणे सोडीत होत्या.ज्यामुळे शिकारीचा एक कुत्रा केव्हाच मरून पडला होता.पुन्हा जाम खवळून मग आम्ही त्यांच्या मागे लागायचो.

प्रत्येकाला हाडहुडीचा आवाज ऐकू आला की समजून जायचे शिकारीचा पाठलाग चालू आहे.आणि त्याप्रमाणे अंतरा अंतरावर असलेले सगळी माणसे त्या आवाजाच्या दिशेने जायचे.मग गोलाकार उभे राहून शिकार करायचे.असा त्यांचा बेत असायचा.पण साळई जंगलात न पळता डोंगराच्या काठाकाठाने पळू लागली.पळत पळत त्यांना अश्या भागाकडे नेले जिथे आम्ही कधी ही शिकारी लोक गेलो नव्हतो.

दमलेले सावज लपण्यासाठी जागा बघणार हे निश्चित होतं.पण कुत्रे त्यांना लपायला जागाच देत नव्हते.आणि वेळही देत नव्हते. घोळपाकची डोंगरी आणि भावाची डोंगरी जिथे संपते तिथे फार

मोठी एक खाई आहे.सगळे लोक तिथे जमले पण सावज कुठे लपले आहे? हे कुणाला कळेना?त्या भर उन्हाळ्यात देखील बऱ्यापैकी तिथे पाणी साचलं होतं.ती दोन्ही सावज बाजूला असलेल्या एका गुहेमध्ये जाऊन लपली होती.

शेवटी सगळेजण आसपासचं परिसर बघू लागले.पण त्यांना शेवटी काहीच मिळेना.कुत्र्यांनी पाऊलवाट ओळखली होती आणि म्हणून ते गुहेच्या दाराशी जाऊन भुंकू लागले होते.आम्हाला समजून आले की सावज इथे लपून बसलय.तसा तो परिसर आमच्यासाठी नवीनच होता.त्यामुळे जरा सांभाळून आम्ही पावले उचलायला शुरुवात केली.

जवळपास माणूस माणूस पाणी तिथे साचून होतं.पण तो येतो कुठून हेच आम्हाला माहीत नव्हते.कारण तिथल्या तिथेच ते पाणी असायचे.आणि खालच्या तोंडीचे पाणी असल्यामुळे तिथे कोणताच जनावर पाणी प्यायला जात नव्हता.इतक्या दिवसांतली आमची पण ती पहिलीच वेळ होती, तिथे जायची.काही वेळ चालून झाल्यानंतर मग आम्ही तिथे गेलो तर माहीत झालं, की पाणी त्या गुहेमधून येत आहे.एक एक करत सगळे आम्ही त्या

गुहेच्या आत जाऊ लागलो.ती सावजे तर दिसली नाही पण जे दिसलं ते मात्र फार भयानक होतं.

गुहेच्या वरच्या भागातून ती पाण्याची धारा कोसळत होती आणि खाली एक हनुमानाची मूर्ती होती.त्यावर त्या पाण्याचा अभिषेक होत होता.ते आमचं बघणं झालं पण इतरांनी काही आमच्यापेक्षा विलक्षण असं बघितलं.एक पंचमुखी भुजंग छत्रछायेप्रमाणे त्या मूर्तीवर डोलताना ते बघत होते.फार अद्भुत आणि अविश्वसनीय होतं ते.ते बघितल्यावर मग आम्ही वापस आलो पण तेव्हापासून जंगलात जाणेच बंद केलं...

माझ्यासाठी ह्या गोष्टी जशा नवीन आणि अद्भुत वाटत होत्या.तशा त्यांना फक्त त्या गप्पा वाटत होत्या.कारण इतक्या दिवसांच्या त्या अनुभवात त्यांनी बऱ्याच प्रमाणात असे प्रसंग पाहिले होते.रात्र बरीच झाली आहे असे समजून मग प्रत्येकजण आपापल्या घरी रवाना झाले.आणि मी पण आतमध्ये जाऊन हलकेच अंथरुणावर पडलो.बाहेरच्या गप्पा जरा जास्तच रंगल्यामुळे घर केव्हा सूनसान पडलं काही कळलंच नाही.पण प्रवासाच्या थकव्यामुळे मी पण लवकरच गाढ झोपी गेलो.

सकाळी ठरल्याप्रमाणे बेत हा आज जरा आगळा वेगळा होता.आज परत एक नवीन स्थळ गाठायचा होता.त्यासाठी त्या धनगराला फोन करून सांगून घेतले आणि आजचा प्रवास चालू केला.रात्रभर निद्रा घेतल्यानंतरही पाय जरा आज ठणकतच होते.पण पायमोजे घातले, बुट घातला आणि निघालो प्रवासाला... बरंच काही बघायच्या तयारीत.

ठरल्या प्रमाणे आज गावातूनच निघालो होतो.अगदी शेवटच्या वळणावर समोर उभे असलेले जंगल माझं छान स्वागत करत होतं.खरतर त्या जंगलातून आम्हाला दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गावापाशी जायचं होतं.कारण तो धनगर मुळी त्याच गावचा असल्यामुळे तो तिथेच आम्हाला भेटणार होता.आणि असं मुख्य रस्त्याने गेलो असतो तर बराच अंतर लांबणार होतं.

पण मनात एक विचार आला की भावाचं डोंगर तर बऱ्याच ठिकाणी कोसळलेले आहे.ज्यामुळे त्या डोंगरावर असं चढता येत नाही.पण आता ज्या ठिकाणावर आम्ही जाणार होतो ते भावाच्या डोंगराचेच एक भाग होते.ज्यामुळे मधूमामाजीला मी विचारू लागलो..तर ते म्हणाले की गावकरी बरोबरच बोलतात.

प्रत्येक बाजूने तो डोंगर कोसळलेला आहे.पण त्याला चढण्यासाठी तीन असे रस्ते आहेत.ज्यांना आम्ही "घाट" म्हणतो.पहिला आहे "पाकळीचा घाट".जो शुरुवातीला पेरजागडापासून अर्ध्या एक किलोमीटरवर असेल.दुसरा आहे "बिवल्याचा घाट". तो मध्यंतर आणि खोल जंगलात आहे.आणि तिसरा आहे "ढोर घाट".जिथून आपण आता जाणार आहोत...

"पण मामाजी.. यांना अशी विचित्र नावे का देण्यात आली."

अरे पहिल्या घाटावर पाकळीचे झाडे आहेत,खचलेल्या गडावर त्यांनी स्वतःची अशी मजबूत पकड केली आहे, ज्यांच्या आधाराने गडावर जाता येते.दुसऱ्या घाटावर बिवल्याची झाडे आहेत.ज्यांच्या आधाराने काही खचलेले दगड अडकून आहेत, आणि त्या झाडांमुळे दगडे घरंगळत नाहीत..त्यामुळे आपण तिथूनच येणार आहोत.आणि ते तिसरे आहे ढोर घाट..त्या घाटावरून गुरे ढोरे जवळपास चराईसाठी नेतात.त्यामुळे त्याला "ढोर घाट" असे म्हणतात.

चालताना बाहेरून जे झुडूपी जंगल दिसत होते.आतमध्ये तेच उठावदार असे झाले होते.हळूच एखादा ससा पायापासून निघून धूम पळत सुटायचा.जंगल दाटीने असल्यामुळे वर असलेला सूर्य नारायण जरा कमीच दिसायचा.त्याची किरणे सहसा जमिनीपर्यंत पोहचत नव्हती.त्यामुळे सांबर,नीलगाय वगैरे असे जनावरे फार प्रमाणात तिथे विहार करत.ज्यांचे मल असे जागोजागी दिसून यायचे.

दोन अडीच किलोमीटर चालून झाल्यावर शेवटी आम्ही ढोर घाटाच्या उतरणीवर काही अंतरावर येऊन पोहचलो.जिथे त्या धनगराला मी फोन करून बोलावले होते.जिथून समोरचा रस्ता आता त्याला दाखवायचा होता.कारण हा भाग तो जास्त प्रमाणात फिरून होता.नेहमी ढोर घाटावर त्याची गुरे जायची.आणि कालच्या प्रवासादरम्यान मी त्याला ओळखून टाकलं होतं, की बढाई मारण्यात तो तरबेज आहे.बाकी त्याला कसलंही ज्ञान नाही.कारण धनगराला एखादं हिरा मिळावा, आणि त्याने ते शेळीच्या गळयाला बांधावा अशी त्याचीही सवय होती.

सागवानाचे उंचच उंच वृक्ष रस्त्यात येत होते.त्याच्या वाळलेल्या पानावरून चालताना चर्र चर्र असा कर्कश ध्वनी

यायचा.आणि या वेळेस नेमकं जागेवरूनच डोंगराची चढाई लागल्यामुळे जरा चालताना दम यायचाच.आणि त्याप्रमाणे जरा थांबत,बसत,पाणी पीत आम्ही चालत होतो.कारण चढाई ही एकसारखी उंच आणि आडीमोडी होती.काही अंतर गेल्यावर मग कळलं की याला ढोर घाट का म्हणतात?

कारण आधार घ्यायला अध्यंतर मध्यंतर झाडे तर होतीच.पण पूर्ण वाट ही उखडलेल्या दगडांची होती.आणि त्यात असलेला प्रत्येक दगड हा गोल अंगाचा होता.त्यामुळे चालताना बऱ्याच प्रमाणात घसरगुंडी व्हायची.आणि चालताना त्या दगडांचा आवाज पण बराच लांब जायचा.ती पायवाट जवळपास अर्ध्या किलोमीटरची असावी.पण जायला एक तास लागतो. घसरगुंडीची ती उंच वाट आज पहिल्यांदाच चढताना थोडीफार मजा यायला लागली होती.चालताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून निघणाऱ्या त्या घामाच्या धारा अगदी अबोलपणे सांगत होत्या.दोन मिनिटं विश्राम घेण्यासाठी थांबलो तर सगळे अगदी उंचावर जाऊन पोहचले होते.

अगदी पायथ्याशी वडाचं झाड वसलं होतं.थोड्या आरामासाठी आम्ही तिथे जाऊन बसलो.त्या झाडाची रचना अशी होती की ते मातीवर उगवले नव्हते. अडगडींच्या दगडांवर

कप्प्याकप्प्यत त्या झाडाची मुळे अगदी अलगद डोळयांना दिसत होती.पण ते उंचावून वाटेवर अशा प्रमाणे उभे होते, की ढोर घाट चढणाऱ्या प्रत्येकास ते, सावलीची मुभा देऊन, विश्रांती देण्यासाठी शीतल छायेचे, अहम कार्य करत होते.

काही वेळाची विश्रांती घेऊन गप्पा गोष्टी करत आम्ही परत प्रवासाला निघालो.पाखरांची कुजबूज आज कानावर येत होती.कारण आता जसजसे आम्ही समोर जात होतो.तसतसे वाट अगदी निर्मनुष्य होत चालली होती.आणि ज्या स्थळावर आम्ही चाललो होतो.वर्षातून एक दिवस फक्त तिथे यात्रा भरते.किंवा इतर गावकरी श्रद्धेने तिथे स्वयंपाक करायला आणतात.

## २१)तास आणि गुप्ती महादेव....

घोळपाकच्या डोंगरावर चढताना अंगाला चिकटणाऱ्या वनस्पती इथे नव्हत्या पण कुसराचे गवत असल्या कारणाने पायांच्या संपर्कात येताच कापडातून अलगद आत जायचे.आणि त्याचे निमुळते टोक असल्यामुळे बऱ्याच प्रमाणात त्वचेला खुपायचे.त्यामुळे इथे चालताना त्या गवताचा मात्र खूप त्रास व्हायचा.जुत्यांवर असला कुसरांचा जमाव जमा व्हायचा आणि दर दहा पावलांवर मला पाय झटकत राहावे लागायचे.

शेवटी कसंतरी करत आम्ही तो मार्गक्रमण केला आणि निघालो.इकडे पाहिजे तेव्हढे दाट जंगल नव्हतं.पण जिथे तिथे असलेले मोकळे मैदान होते. दुरून बघावं तर जंगलामुळे दिसत नव्हते.चालताना जवळच एक मोहफुलाचं  वृक्ष दिसलं.ज्याला बघुन "कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे "....ही ओळ आठवली.कारण अगदी त्या ओळी प्रमाणेच त्या झाडावर एक पाकळीचा झाड उगवला होता.एकच झाडाच्या खोडावर दुसरे झाड. खरंतर ते निसर्गाचीच एक देण असते.एखाद्या पाखराच्या विष्ठेहून किंवा चोचीतून बी बियाणे झाडावर असतात.आणि त्याच झाडाच्या ओलाव्याला पकडून ते स्वतःचा अस्तित्व प्रगट

करतात.हे असं का असते?हा प्रश्न मी मधूमामाजीला केला...त्यावर ते म्हणाले...

"ते पूर्वजन्मीचे पाप असते.जे या जन्मात फेडणे असते.मागच्या जन्मात काहीतरी कर्ज असेल त्या झाडरुपी जीवांवर.त्यामुळे या जन्मात हे दुसरं झाड त्याचं घेणं करत आहे."

"म्हणजे पुनर्जन्मावर तुमचा विश्वास आहे..मामाजी"

त्यात काय आहे... न असण्यासारखा.प्रत्येक सजीव सजीव आहे.जर प्रत्येकालाच वेशभूषा बदलावासी वाटतेच आहे.मग जन्म तर बदलणारच.आणि राहिली गोष्ट विश्वासाची. तर विश्र्वासच नसेल तर आपण जगायचं कोणाच्या आधारे.

खरंच जगण्याची फार मोठी गोष्ट आज मामाजीने मला सांगितली.आकाशात देव असतो की चंद्र तारकांचा समूह हे कुणालाच माहीत नाही.पण बघणाऱ्याला देवही दिसतो आणि चंद्र तारकांचा समूहही.शेवटी एक विश्र्वासच असते.कारण श्रद्धा,कल्पना,भावना ही सगळी तिथूनच जन्म घेतात.अर्थात जरी सांगायचे असले तरी अख्खं आयुष्य आपलं विश्वासावर टिकून

असते.आणि ते विश्र्वासच असते जे आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर आपणांस जगण्यास भाग पाडते.कारण आशा ही विश्वासावर अवलंबून असते.

जर बघायला गेलं तर प्रत्येक गोष्ट एखाद्या कल्पनेसारखं असते.आपण काय आहोत? जर एखाद्या मुंगीकडे आपण बघितले, तर आपल्या नजरेत ती एक क्षुद्र कीटक आहे.मग जगाच्या दृष्टीने बघावे तर काय?आपणही त्या मुंगी सारखेच एक क्षुद्र बनून जातो.त्याहून अवघड म्हणजे जगणं आणि मरणं.माणूस मेल्यानंतरही कल्पना त्याला सोडत नाही.कधी कोणत्या रूपाने परततो.मग स्वर्गात गेला की नरकात गेला.परतला तर कुण्यावंशी गेला.जर एकप्रकारे वैयक्तिक विचार करावं तर सत्य दिसूनच येत नाही.फक्त कॅमेऱ्याच्या समोर असलेला पुतळा असतो आपण.

दर चाळीस मैलांवर भाषा बदलते.विचार बदलतात,प्रथा बदलतात.पण नियम असतातच जगण्यासाठी.आणि तेच आपण करतो.कसे जगलो तर माहीत नाही? आणि कसे मरतोय तर ते कधी कळणारच नाही...असो...

निसर्गाची किमया खरोखरच अगदी निराळी आहे.त्याचा आस्वाद जणू वेगळाच आनंद भासवत होता.इथे असलेला एकांत, जगण्याविषयी तसेच जगवण्याविषयीच्या भावना,सृष्टीच्या लहरत आलेल्या भावना बरंच काही अप्रूप असते.पूर्वीचे साधू संत याच आश्रयाने इथे असतात.हे या दिवसांत मला कळत होतं.आणि मी पण शेवटच्या क्षणी हेच निसर्ग अनुभवत होतो.

काही वेळातच आम्ही तिथे पोहचलो.तशी दुरूनच ती हिरवळ मला दिसली होती.जी मला सातधाराच्या आसपास दिसली होती.पावसाळी दिवसांत तिथून बऱ्याच प्रमाणात पाण्याचा ओघळ वाहत असतो.ज्यामुळे पावसाची ती सरी कोरडी होऊन खुललेली होती.आणि मृदेची कमतरता असल्यामुळे फक्त दगडेच दिसायची.

मधूमामाने सांगितल्यानुसार पूर्वी येथे एक ऋषी असायचे.बाजूलाच काही मुर्त्यांची स्थापना केली होती.जी त्या ऋषीने केली होती असं गावकऱ्यांचं म्हणणं आहे.आणि त्यांची पण मूर्ती बैठक घालून तिथे तयार केली होती.मला वाटते, जवळपास आत्तापर्यंतचे तिसरे किंवा चौथे असे ठिकाण होते.जे पाण्याच्या बाबतीत एक नैसर्गिक चमत्कार होते.एक छोटंसं बीड असल्याप्रमाणे दगडांच्या मध्यातून ते पाणी उगम होत होतं.

शिखरावरून ते पाणी कुठून निघत असेल? हे एक आश्चर्यच होतं.पण ते आश्चर्य आता पहिलं राहिलं नव्हतं.त्यामुळे मी आजूबाजूचा परिसर न्याहाळून बघत होतो.गावकरी या स्थळाला "तास" म्हणतात.

उन्हाळी दिवसांतसुद्धा ते पाणी तसेच संथपणे वाहत असते.आणि अवघ्या दहा ते पंधरा पावलांवरच जमिनीत मुरत असते.पाण्याच्या शोधात सगळी जनावरे तिथे पाणी प्यायला येतात.दगडांच्या सरीमधून वाहणारे पाणी हे एक अद्भुत जलकुंभ म्हणून डोळयाच्या समोर येत होतं.

ठरल्याप्रमाणे काही वेळ आम्ही तिथेच थांबलो.आणि तिथलं पाणी पिण्यासाठी बॉटलमध्ये पकडलं.स्वच्छ आणि साफ असलेलं ते पाणी चवीलासुद्धा अगदी तितकंच गोड होतं.सगळ्यांनी पाण्याचा आस्वाद घेतला आणि आम्ही पुढच्या तयारीला लागलो.

आजूबाजूला दाट असलेले जंगल काही जागेत विरळ होऊन जायचे, तर काही काही जागेवर अगदी मोकळे मैदान असायचे.हल्ली आम्ही तासावर जाणाऱ्या प्रवाहाच्या उलट्या दिशेने जात होतो.पाण्याची वेगवान धारा अगदी लोखंडाला सुद्धा

कापू शकते हे आपण ऐकलंच असेल.पण ती वाहिनी जेव्हा सपाट मैदानावरून वाहते.तेव्हा दगडांनाही खरचटते असं दिसत होतं.खरचटलेले दगड अगदी स्पष्टपणे दिसत होते.आणि दगडांची किमया सांगायचीच असली तर इथलं दगड फार प्रमाणात वजनी आहे.कारण त्यांच्यात लोखंडाची क्षमता आहे ज्यामुळे त्याचं वजन इतर दगडांपेक्षा थोडं जास्त प्रमाणात भरते.

तासापासून अवघ्या एक सव्वा किलोमीटरवर "गंगारगोटी" नावाचे एक स्थळ बघायला मिळते.नावाप्रमाणेच वाहत्या पाण्याच्या ओहोळीने दगडांमध्ये अशा पद्धतीने घळई  तयार केली आहे,की जणू बघणाऱ्याला वाटते की इथे गंगार ( विदर्भात पाणी वापरण्यासाठी असलेला मातीचा भांडा.जो आज बऱ्याच प्रमाणात लुप्त होतो आहे.) पाण्याने भरून ठेवलाय.पण आम्ही कोरडे गंगार बघण्यात मजा घेतली.ज्याची मजा पावसाळी दिवसात घ्यायची असते.पावसाच्या सनातन प्रवाहात त्या दोन्ही गंगाराची किमया बघणाऱ्यास एक आश्चर्यचकित झाल्याची प्रेरणा मिळते.

गंगारगोटीपासून अवघ्या पाचशे ते आठशे मीटर वर एक दगडांचा शिखर रचला होता.नुकतेच आम्ही पायदळी त्या भागावर पोहचलो होतो.सपाट मैदानावर चालल्यामुळे सूर्याच्या किरणांनी

आमच्यातला द्रव्य चांगल्याच प्रकारे शोषण केलं होतं.ज्यामुळे बाजूलाच असलेल्या झाडाच्या खाली मी विसावत पडलो.अचानक त्या दगडांचा ढिगारा माझ्या मनात रुचू लागला.त्यामुळे मी मधूमामाला त्याविषयी विचारले...हे काय आहे मामाजी?

"हे आहे गुप्ती महादेव..."

( अचानक रात्री ऐकलेले नाव आठवलं.) "अच्छा ..म्हणजे इथला सुरक्षा दैवत म्हणजे हेच काय?"

"हो ....अर्थातच... जमिनितला द्रव्यासाठा काढण्यासाठी जी लोकं इथे येतात.त्यांची दशा करतो हा..महादेव.."

"पण मग त्यांची मूर्ती वगैरे दिसत नाही ना इथे
..त्यांची कोणी पूजा वगैरे करत नाही काय?"

"तसं काही नाही..पण त्याच्या नावातच त्याचा अर्थ दडलाय...गुप्ती महादेव.म्हणजे गुप्तपणे संचार करणारा.आणि तो

आतमध्येच असतो जमिनीच्या. इथलं एक जागृत दैवत्व आहेत हे."

"अच्छा...म्हणजे यासाठी हे इतक्या दूर वसले आहे..."

"तसं नाही...जागृत असल्यामुळे वाईट तितक्याच चांगल्या माणसांना त्याचा त्रास व्हायचा.त्यामुळे त्याला इकडे मांडण्यात आले आहे..."

"अच्छा..."

आजचा प्रवास तसा फार काही मोठा नव्हता.पण नकळत गुप्ती महादेवाची सर मला अजुन लाभणार होती आणि तीही अगदी लवकरच.त्यामुळे फारसं विचार न करता आता जायचं कुणाकडून आहे.म्हणून दोन्ही जाणकारांकडे बघू लागलो.आणि उलट जाणे म्हणजे त्याच कुसरांच्या गवतातून पाय झटकत जाणे.म्हणून जरा नवीन रस्त्याने चला असं मी मधूमामाला म्हटलं.

त्यांनी जंगलातून वाट काढत भावाच्या डोंगराच्या दुसऱ्या घाटावर आणले.ज्याला बिवल्याचा घाट असे म्हणतात.उतरताना

झिलबुली ( गावखेड्यात असलेल्या एका झुडूपाचे नाव.ते इतर कोणत्याही जंगलात आढळते.)फार प्रमाणात अडकवण्याचा प्रयत्न करत होती.कसलीतरी हालचाल पायथ्याशी जाणवत होती.त्यामुळे वारंवार मधू मामाजी तिकडे बघू लागले.

खाली उतरल्यावर कळलं की नीलगायींचा एक झुंड त्या पायथ्याशी असलेल्या झाडाखाली विश्राम करत बसल्या होत्या.पण आमच्या चालण्याने त्यांना थोडाफार संशय आला आणि त्या पळून गेल्या.थोडाफार निरीक्षण करत मामाजी म्हणाले...

इथे तर यांचा ठीय्याच आहे.सगळे प्राणी याच परिसरात असतात.आणि इथे न यायचं कारण म्हणजे मागील वर्षी(हाताने इशारा दाखवत.) त्या तिथे गावातील एका तरुणाला वाघाने ठार मारले होते.ज्यामुळे सहसा इथे कुणी येत नाही.

काही कालांतराने समोर आल्यावर मग सरपण गोळा करण्यासाठी येणाऱ्या महिलांची पायवाट लागली.त्यात आम्ही मग अलग झालो.धनगर स्वतःच्या गावाकडे गेला आणि आम्ही परत आपल्या गावाकडे वळलो.

तसं हा प्रवास संपला तर नव्हताच.पण मला वेळ मिळाली ती इतर गोष्टी जाणून घेण्यासाठी.परतताना ठरलं तर नव्हतंच की उद्या कुठे जायचं म्हणून.पण इतक्यात मी कुठे कुठे गेलोय? हे मला मात्र बघायचं होतं.त्यामुळे वेळ न दवडता मी घरी एकांत गाठला.आणि सगळ्या वस्तुंवरून एक नजर फिरवू लागलो.पण त्या नक्षात आज मला काहीच उमगत नव्हते.कारण जिथे जिथे त्या लाल रेषा मागे दाखवत होत्या.त्या मिटलेल्या होत्या.पण पेरजागडाभोवती तेच रेषाखंड रेखाटलेले दिसून येत होते.आणि त्याप्रमाणे मी मोबाईल काढून मॅप वर बघू लागलो.

आज जे बघत होतो खरं तर एक प्रकारची अनुभूती अंगावर संचार करत होती.कारण अगदी त्या आकृत्या मधून मी प्रवास केला होता तरी पण मला काहीच असं आढळलं नाही.पण इतक्यात जे चुकलं होतं ते म्हणजे "हत्तीखोयाळ".लोकांच्या मते सांगायचं राहिलं तर बावन्न खोल्यांचं प्रवेश द्वार.जिथे जाण्यासाठी खालच्या बाजूने फक्त जंगलातूनच जायला मार्ग होता.कारण पेरजागडावरून उतरून जाणे हे कधीच शक्य नव्हते. वरच्या दिशेने सपाट असणारं, खाली असलेल्या बाजूला विशाल होत चाललं होतं.ज्यामुळे गडावरून फक्त खोल भाग दाखवत होते.

मी जेव्हा पाच पांडव गुहेचे दर्शन घेतले होते.तर दगडांमध्ये कोरलेल्या त्या पाच खोल्या अगदी उंचावर होत्या.ज्यात आक्सिजन घ्यायला वगैरे भरपूर मोठा द्वार आहे.पण गडाच्या या पायथ्याशी कुण्या बाजूला त्या खोल्या असतील?कारण गडाच्या वर सात खोल्या आणि खाली परत ह्या बावन्न खोल्या.

आणि वर ह्या गडाची गाथा काही वेगळेच सांगत होती.सात बहिणींचं अस्तित्व प्रगट करत होती.शिवाय ही सात बहिणींची पण कहाणी मला जाणून घ्यायची होती.काय रहस्य होते जे माझ्या डोक्यात येत नव्हते?आता फक्त हत्तीखोयाळ होते बघायचे.सहसा त्या दरीत कुणी जात नसत.कारण त्या घनदाट जंगलातून रस्ता काढत यावं लागायचं.आणि पायथ्याशी सदोदित वाघांचं वास्तव्य असायचं. एकट्याचा निभाव लागणे खरंच कठीण होतं.

मधू मामाजीला कुठे जायचं असेल तर सायंकाळी किंवा सकाळीच त्यांना सांगावं लागायचं.अन्यथा ते भेटायचे नाही.मी कितीतरी वेळ त्या नक्षाचा विचार करत होतो की काय आहे मी? ज्यांचं अनुसरण करत मी इथपर्यंत आलो होतो.इतकी भ्रमंती केल्यावरही काहीच कसं वास्तव्य गवसत नाही.मला जगायचं

आहे. मरायचं नाही आहे.मला अजुन आयुष्य बघायचं आहे.जे माझं स्वातंत्र्याचे आहे.ज्यावर कुणाचाही हक्क नाही.

चेहऱ्यावर थोडीशी नाराजीची छटा बघुन माझी लहान बहीण प्राजक्ता, त्याचे कारण विचारू लागली.मी काही नाही असं म्हणून टाळून दिलं.पण कुठेतरी काहीतरी चुकतंय अशी हृदयाला फार चेतना येत होती.त्यामुळे निश्चितच मला गेलं पाहिजे असं वाटत होतं.रात्रभर विवंचनेत असताना मला शेवटचा उपाय तोच वाटला की आपण जाऊन यावं.बघुन घ्यावं की बावन्न खोल्यांचं काय रहस्य आहे ते...

सकाळीच मधूमामाजीकडे जाणे झाले.अंगणात बरीचशी वर्दळ दिसली.नंतर कळले की वनौषधी घेण्यासाठी बरीच माणसे त्यांच्याकडे येत असतात.मला बघताच ते म्हणाले..अरे पवन.. येना....मी बाजूच्याच चारपाईवर बसून त्यांची जडीबुटी बघू लागलो.काही वेळानंतर त्यांचं जेव्हा देवाणघेवाण झालं.तेव्हा मामीला चहाचं सांगून माझ्यापाशी येऊन बसले.हातात कशाची तरी भुकटी होती.

"हे काय आहे?"

"रात्रीला पाय दुखत असतील ना...दिवसभर चालून चालून..हे खावून घे...पाय त्रास देणार नाही.मी येणारच होतो घराकडे.पण बरं झालं तुच इकडे आलास. बरं बोल काय काम काढलास...?"

"मामाजी मला हत्तीखोयाळ बघायचं आहे..."

"बस इतकेच ना...मग काल का नाही सांगितलेस?"

"ते माहीत नव्हतं ना मला?अलगद चर्चेमधून माझ्या कानावर आलं.गावकरी म्हणतात तिथे बावन्न खोल्या आहेत."

"गावकरी काहीही म्हणतील? कारण ती श्रद्धेची गोष्ट आहे.पण तो प्रवेशद्वार तर सापडायला हवा ना..ते असेच कुणाला दिसत नाही."

"अच्छा...पण जे आहे ते तर दिसणार ना..."

"अर्थातच..."

"मग केव्हा निघायचं...?"

"तू म्हणशील तेव्हा.."

"ठीक आहे मग जेवण झाल्यावर निघुया..."

माझं कसं आहे.जोपर्यंत हा प्रवास होता.बोलायला बरीच लोक होती.तोपर्यंत निदान त्यांच्यासाठी तरी उसने अवसान चेहऱ्यावर आणावे लागायचे.पण एकांत मिळाला की परत त्याच प्रश्नांनी माझं विचारचक्र चालू व्हायचं.जिथं माझी वाट फक्त मृत्यू बघत होता. त्याचं साधं कारणसुद्धा मला माहित नव्हतं.आणि मी फक्त वाहवत होतो.एका अज्ञात लेकरासारखे.

## २२) हत्तीखोयाळ भ्रमंती...

दोन दिवसांच्या अनुभवापोटी त्या धनगराची मला चांगलीच अनुभूती आली होती.ज्यामुळे आज तरी मला त्याला न्यावेसे वाटले नाही.कारण एकटा मधूमामा माझ्यासाठी प्राणदाता होता हे मी केव्हाच ओळखलं होतं.त्यामुळे आज आम्ही दोघेच निघायचं ठरवलं होतं. तसं पण जंगलाच्या आत तर जायचं नव्हतंच.गडाच्या मागच्या बाजूला पायथ्याशीच जायचं होतं.त्यामुळे आज सकाळी तयारी करून जरा गडाच्याच रस्त्याने निघालो होतो.तिथून अर्ध्या रस्त्यातून जंगलात प्रवेश केला.

झुडूपी जंगलातून जाताना पायथ्याशी एक नाला लागला.ज्यात बऱ्याच प्रमाणात अभ्रकांची संख्या होती.सहज एक दगड उचलला आणि बॅगेत टाकला.आणि परत एकदा ते प्रवास शूरू झालं.. निशानांचे निरीक्षण करणे,विष्ठेचे परीक्षण करणे,कधी नागमोडी,तर कधी आडीमोडी अशा पद्धतीचे प्रवास चालू होते.चालताना मी कित्येकदा मागेच असायचो.मग काहीवेळा धावावं लागायचं.

मला वाटलं ते स्थळ जवळ असेल पण तितक्याच अंतरा अंतराने आम्ही चालत होतो.मधूमामा मोकळी जागा दिसली की एकवार पेरजागडाकडे बघत आणि मग परत चालायला लागत.त्यांच्या मागोमाग चालत मी पण जायचो.मध्येच रस्ता चुकला म्हणून मधू मामाजी माझी मस्करी करायचे.मी फक्त माना डोलावत होतो आणि अचानक अंगावरून काहीतरी गेल्याचं जाणवलं म्हणून इकडे तिकडे बघू लागलो.मी थकलोय असे समजून मग मामाजी पण जवळ येऊन बसले.

आम्ही जिथे बसून होतो.हत्तीखोयाळ तिथून अजून दोन ते तीन किलोमीटर होतं.आणि आता तर फक्त चढाई होती.डोंगर केव्हाचाच झाडाच्या आड लपला होता.पण इतक्यात आजूबाजूला काहीतरी कुजल्याचा, सडल्याचा दुर्गंध यायला लागला होता.तोच दुर्गंध मधूमामाजीला पण यायला लागला होता.म्हणून ते आजूबाजूच्या परिसरात फिरून पाहत होते.

जंगल भागात असणाऱ्यांना ही एक चेतावणी असते.जेव्हा कधी ही दुर्गंधी आपल्या जवळपास असते, तेव्हा जवळच कुठेतरी वाघ दडून बसलेला असतो.त्यामुळे बरेच शिकारी या दुर्गंधी पासून स्वतःला जपण्याचा प्रयत्न करतात.आणि सहसा त्यापासून वेगळं

होण्याचा लवकरात लवकर प्रयत्न करतात.प्रत्येकात असलेल्या कमीमध्ये या वाघात असलेली ही कमी.कारण एक वेळेस तो स्वतःच्या पायाचा आवाज लपवू शकतो पण स्वतःच्या येण्याचा सुवास नाही.

बरंच बघितल्यावर जवळपास असं काहीच दिसलं नसल्यामुळे मधू मामाजी मग म्हणाले...चल निघुयात..कारण इथून त्याचंच राज्य आहे..तर असेल फिरत जवळपास...

इतक्याने बरं होतं की चढाई चढताना फक्त दगडांच्या सऱ्या होत्या.उंच झाडांमुळे बऱ्याच प्रमाणात दूरवरचा परिसर दिसून यायचा.त्यामुळे जनावरांची तेव्हढी भिती वाटत नव्हती.आणि सांगायचं राहिलं तर दुपारची सगळी जनावरे पाण्याच्या शोधार्थ पाण्याच्या जवळपास असतात.पायथ्याशी असेलच तर वाघ,अस्वल किंवा रानडुकरे असतात.

चढाई करताना आज त्यांच्या चालीने चालायचं ठरवलं.कारण मधू मामाजी अगदी त्या जनावरांच्या चालीने चालायचे.त्यामुळे त्यांना फार प्रमाणात दम येत नव्हते.आणि नजर अशी तीक्ष्ण असायची, की सहज कोणत्या बाजूने जायला रस्ता

मिळेल, हे अगदी मिनिटभर उभे राहिले तरी ठरवून टाकत.त्यामुळे मला त्यांचं भारी कौतुक वाटायचं.

आता मोठ्या दगडांची बैठक यायला शुरुवात झाली होती.ज्यामुळे पलीकडे काही बसून तर नसेल ना, अशी भिती मनात संचार करायची.बरेचदा त्या दगडांच्या कप्प्यातून काही साप वगैरे निघतो का? असं वाटायचं.गडावरील एखादे दगड घरांगळले की ते दगड पायथ्याशी लोळण घेत खाली यायचे.ज्यात बऱ्याच प्रमाणात झाडे मोडून पडायची.त्यामुळे गडाच्या पायथ्याशी असलेल्या दोनशे ते तीनशे मीटर पर्यंत बऱ्याच प्रमाणात विरळ झाडे होती.

आम्ही गडाच्या अर्ध्या पाऊण टप्प्यावर आलो होतो.पण त्या भयाण शांततेत सुद्धा वाळलेल्या पानांचा भयानक आवाज येत होता.नुकतेच आम्ही पेरजागडाच्या पायथ्याशी पोचलो होतो.हा आवाज कसला येतोय? म्हणून मधू मामाजी उंच दगडांवर उभे होऊन समोर बघू लागले, तेव्हा कळले की रानडुकरांचा कळप पायथ्याशी वावरत आहे.हळूच मला म्हणाले...म्हणून मघाशी तो दुर्गंध येत होता.कारण इथे तो रानडुकरासाठी वावरत होता..मग आता जायचं कसं?

"थांबुयात थोडावेळ...ती थोडी समोर उतरली की निघुयात.."

तसं आम्ही जिथे बसून होतो.तिथून थोड्याफार प्रमाणात हत्तीखोयाळ दिसत होता.तरी अजून पाच ते दहा मीटर ची चढाई होती.ती उभाट अशी होती.पाय घसरला की सरळ खाली पसरला.एक नजर खालून मी पेरजागडाकडे टाकली.डोळ्यांसमोर विशाल दगडाची रचना अशी दिसून येत होती.ती भयाण दगडे आणि जागोजागी असलेली भुयारे.चित्रविचित्र कडा,आणि प्रत्येक दगडांची ती रचना.सगळं कसं पुन्हा एकदा अद्भुत वाटत होतं.पावसाचं संपूर्ण पाणी झरोख्यातून दगडांद्वारे पाझरत असल्यामुळे बऱ्याच जागी काळपट दगडे झाली होती.

त्या डुकरांचं पण काही समजत नव्हतं.काय बघत होते? काय खात होते?पण मध्येच आवाज करत काहीतरी पायाने खोदल्यासारखं करत होते.आणि जिथे तिथे हुंदडत होते.जवळपास एखादं तास झालं असेल ती गडाच्या दुसऱ्या टोकाला गेली.आणि आम्ही मग जाण्यासाठी तयार झालो.

मधूमामाजी पायथ्याशी एका दगडावर सिगरेट पित बसले.आणि मी हळुहळू गड चढू लागलो.एक एक पाऊल सांभाळून टाकावे लागत होते.कारण पावसामुळे गडावरील दगडे घरांगळून तिथे साचले होते.आणि शिवाय पकडायला कशाचाच आधार नव्हता.त्यामुळे दोन्ही हात टेकत मी सावधानतेने चढण्याचा प्रयत्न करत होतो.

काही वेळाने चढाईचा भाग संपला आणि गडावरील दगडांचा आधार मिळाला, ज्याच्या साहाय्याने मी दगडांचा आधार घेत त्या हत्तीखोयाळच्या पायथ्याशी आलो.आता इथून वाट निरूंद होती.दोन्ही बाजूला गडाची दगडे एखाद्या भिंतीसारखी उंचच उंच गेली होती.वर बघण्यासाठी मान अशी उंचच उंच जात होती.अगदी वाटेवरच दोन प्रचंड दगडे आली होती.कदाचित गडावरूनच ती घरंगळून आले असेल असे वाटत होते.आणि ती अश्या पद्धतीने वाटेत होती की त्यावरून चढता सुद्धा येत नव्हते.

मी कसंतरी प्रयत्न केला आणि त्यावर चढलो.जसजसं त्या दगडांवर चढू लागलो.अगदी तस तसं त्या गुहेचं द्वार मला दिसू लागलं होतं. दगडांवरून वर आल्यावर मी मधूमामाकडे बघितलं,तर पायथ्यावर बसलेले ते अगदी छोटेसे फुलपाखरू

असल्यासारखे दिसत होते.त्या दगडांवर एक बराच मोठा वृक्ष कोसळून पडला होता.आणि वर असणाऱ्या झाडांचा सगळा पालापाचोळा त्या हत्तीखोयाळ मध्येच साचायचा.ज्यामुळे तिथली दगडे पूर्णपणे झाकून गेली होती.अगदी पायाखाली एखादी गादी अंथरल्यागत पाय तिथे रुजायचे.

मी जरा सावरत सावरत गुहेच्या तोंडाशी गेलो.तर असंख्य प्रमाणात चमगादडांचा झुंड त्या गुहेच्या आत शिरला.ज्यामुळे मी थोडं घाबरल्यासारखा झालो.गुहेचा तोंड इतका विशाल होता की सहज माणूस उभा होऊन आत जाता येईल.त्याप्रमाणे मी मोबाईलची टॉर्च लावली आणि गुहेच्या आत प्रवेश केला.

अंधारमय काळोख जसा उजेडाच्या स्वाधीन होत गेला.तसतसे चमगादडे आणखी आणखी आत जाऊ लागले.कालांतराने गुहा पण आतून निरुंद होत गेली.मी जाऊ लागलो आतमध्ये.जिथपर्यंत जाता येईल तिथपर्यंत.आतमध्ये एक शांततेचा सन्ना टा पसरला होता.फक्त आवाज येत होता तो चमगादडांच्या फडफडण्याचा.तरी वाट मात्र संपत नव्हती.समोर ती गुहा एकदम रांगुन जाता येईल एवढंच अंतर दाखवत होती.जवळपास मी पाच ते सात मीटर आतपर्यंत गेलो होतो.अजून

जाता येईल ह्या प्रयत्नात मी चालतच राहिलो, पण ती गुहा समोरून बंद झाली होती.तिथून ती वरच्या बाजूस निघाली होती.तिथेही वर जाता आलं असतं. पण आधीच भरपूर वेळ झाली असल्या कारणाने, मी बाहेर निघण्याचा प्रयत्न केला.

इतकं मात्र कळलं होतं, की बावन्न खोल्या आहेत की नाही ते माहीत नाही पण ती गुहा मात्र वरच्या दिशेला जात होती.जी निश्चितच कुठेतरी निघत असेल.मनात असा विचार करत मी गुहेच्या बाहेर आलो.कपाळावरचा घाम पुसला.तितक्यात मधूमामाजी मला आवाज देताना दिसले.मी काही फोटोज् घेतले आणि उतरायला लागलो.

अचानक मला कुणी तरी बघतोय असा आभास झाला. खरंतर हत्तीखोयाळची गुहा ही गडावर जाणाऱ्या वाटेवरून दिसत नव्हती.पण खाली उतरताना अलगद त्या कड्यावर लक्ष गेली.कुणीतरी तिथून मला बघत आहे असं वाटलं.आणि परत एकदा तिकडे बघितलं तर काहीच नव्हतं.कदाचित आभास असेल असे समजून मी उतरू लागलो.पण वारंवार माझी नजर त्या कड्यावरच जात होती.पायथ्याशी सिगरेट पित असलेले

मधूमामाजी काय बघतेस? म्हणून खुणावू लागले.आणि मी काही नाही असं म्हणून चालू लागलो.

जाताना एकच विचार येत होता.की हो न हो नक्कीच तिथे काहीतरी दडलंय.जवळच कसलीतरी शिळ कानात गुंजत होती.आणि मन त्या गुहेत अडकल्यासारखे वाटत होते. राहून राहून तोच विचार मनात साचत होता, की आपण अर्धवट ती गोष्ट सोडली आहे.काय असेल त्या गुहेच्या उराशी हाच एक प्रश्न मला सतावत चालला होता.

माझ्या मनातलं गुपीत कदाचित मधू मामाजीला कळलेलं असावं.पण त्यांनी त्या बाबतीत माझ्याशी कसलीच विचार सरणा केली नाही.पण त्यांचं एक निराळं चक्र होतं.चेहऱ्याने तसे कधी दाखवत नसले तरी विचारांची शीला त्यांची उच्च होती.एव्हाना मी घरी पोहचलो होतोच.पण मन माझं अजूनही तिथेच अडकले होते.एक आनंदही होता आणि एक शंकाही.पण आता गडाची काय व्याख्या आहे.हे जाणून घ्यायचं होतं.म्हणून मग मी थोडी धावपळ करायचं ठरवलं.

अचानक लक्षात आलं की एकदा बघितलेली वाट मी कधीच विसरत नाही.त्यामुळे कधीतरी मी एकटाच जाणार अशी उत्साहाची शक्ती अंगात संचारत होती.आणि गडाविषयी काही माहिती गोळा करायची असेल तर ती गावातून होईल असं तर वाटत नव्हतं.कारण कुणालाही विचारावं तर फक्त गडाच्या हसण्याचा आणि रडण्याचा सांगत असतात.एखादं गड हसणं रडणं ऐकून प्रतिक्रिया देणं ही काही सहजासहजी होणारी गोष्ट नव्हती.त्यामुळे त्याचं काय प्रती कारण आहे ही जाणून घ्यायची माझी बऱ्याच प्रमाणात उत्कंठा होती.

त्या गडासाठी मी त्याच्या ट्रस्टींना तसं बघलं.पण त्यांच्या लेखनात किंवा निदर्शनात अशी एकही गोष्ट मला आढळली नाही जी माझ्या अस्तित्वाशी निगडित असेल. खरं तर गड हे निसर्गाची देण असते.पृथ्वीच्या भूगर्भातून होणाऱ्या ज्वालामुखीच्या उद्रेका मुळे होणारी पर्वताची रचना, आपण भूगोलात वाचतच असतो.या गडाची रचना सुद्धा तशीच असेल असं वाटत होतं.आणि शोधमोहीमची जर गोष्ट निघाली, तर सगळयांच्या तोंडून फक्त टोंगरे महाराजांचं नाव निघत होतं.त्यामुळे सगळयात आधी त्यांनाच गाठायचे ठरवलं.

त्यासंबंधी मी गावात विचारपूस करून त्यांचा पत्ता घेतला.आणि सोनापुरवरून थोड्या अवधीसाठी निरोप घेतला. तसं त्याप्रमाणे मी वेळ न दवडता रामगिरी पर्वतावर महाराजांना भेटायला गेलो.त्यांनी त्यांच्या शिष्याचे जे नंबर दिले होते त्यांचं पण शोध करत करत मी ती कहाणी शोधण्याचा प्रयत्न करत होतो.जी आजपर्यंत प्रत्येकजण अर्धवट स्वरूपात सांगत होता.जवळपास चार ते पाच लोकांजवळ येरझारा मारली, तेव्हा मला त्या गडाबद्दल ती कहाणी ऐकायला मिळाली.

कारण टोंगरे महाराजांच्या नंतरही कुणी एक महाराज होते त्या गडावर.ज्यांचं काही कालावधीतच निधन झालं.आणि टोंगरे महाराजांना ज्या रहस्याची माहिती होती.जाण्याआधी त्यांनी ती त्यांना देऊ केली होती.पण त्यांच्या निधनानंतर ती सगळी माहिती लुप्त होऊन गेली होती.जी कदाचित कुणाकडेच नव्हती.

आणि त्याच शोधासाठी जवळपास मी कितीतरी आटोकाट प्रयत्न केला.शेवटी जे मिळवायचं होतं ते मिळवण्याचा आनंद चेहऱ्यावर उमटत नव्हता.कारण मृत्यू कशामुळे आपल्यावर हवी झालंय.फक्त ते मला जाणून घ्यायचे होते. ज्याचं कारण फक्त आणि फक्त पेरजागडच सांगू शकत होता.जे आभासी वास्तव्य मला येत

होते.ज्यात त्या गुहेचा अंत होता.ज्यात माझ्या मृत्यूचे रहस्य लोप पावले होते.ज्यात माझ्या चार मित्रांनी जीवदान केलं होतं.ज्यात मी पण एक ठोकळा होऊन मृत्यूच्या स्वाधीन होणार होतो.

## २३) रितूची शोधमोहीम...

इकडे रितूचं एक ठरलेलंच होतं.कारण तिच्याही मनात माझ्या बद्दलचं एक न्यूनगंड साचलं होतं.ज्याची जबाबदारी ती दुसऱ्यावर सोपवू शकत नव्हती.कारण जाणारा माझा जीव,जितका माझा जीव जात होता तितकाच तिचा पण, माझ्यासाठी जीव जात होता. आणि स्वतःचं जीव कुणालाच देवघरून अमरत्वाचा मिळत नसतो.त्यासाठी त्यालाच पाप आणि पुण्यरहित कार्य करावे लागते.

त्या दिवशीच्या प्रसंगामुळे पेरजागडाच्या नावाने एक अनामिक हुरहुर निर्माण झाली होती.आणि ती कुणाला,तर इन्स्पेक्टर राठोडला.कारण मधूमाश्यांचे डंख आजही त्यांच्या अंगावर डिवचत होते.आजपर्यंत केलेली ही सगळ्यात मोठी चूक आहे, असं त्यांना वाटत होतं.पण रितुकडे बघुन त्यांना परत परत त्या घेतलेल्या प्रणाची आठवण व्हायची.आणि या रहस्याचा शोध लावायचाच असं विचार करून, परत नव्या जोमाने ते कामास लागायचे.कारण सत्वाची अनुभूती काय असते? हे त्यांनी ओोळखलं होतं.

त्यादिवशी त्यांच्या झालेल्या चुकीला ते स्वतःच कारणीभूत झाले होते.ज्यामुळे त्यांनी त्या दिवशी हॉस्पिटलमध्ये रितूला म्हटले, की आता आपण त्याचा शोध मिळून करायचा.तुमच्याजवळ असं काही पुरावा नाही का? जे तुम्हाला त्यांच्यापर्यंत नेऊन पोहोचवेल..

"एक मिनिट..."

त्यावेळेस माझा मोबाईल स्विच ऑफ पद्धतीत रितुकडेच होता.आणि चार्जिंग करून तिने ठेवला होता.आजही त्याच्या मोबाईलची पासवर्डची शब्द आमच्या दोघांच्या नावातली दोन दोन अक्षरे काढून बनवलेली होती.त्यामुळे टीचभर डोळ्यांनी माझ्याकडे बघत दोन टपोरे थेंब काढले आणि मोबाईलचं पासवर्ड ओपन केला.तिथून मग ती मॅपच्या लोकेशनला गेली.आणि त्या महित्यातल्या प्रत्येक स्थळांची ती लोकेशन बघू लागली.

कदाचित तिला काहीतरी आशा मिळेल अशी शंका होती.आणि शेवटचं लोकेशन ती बघू लागली.पण पेरजागडपासूनची सगळी लोकेशन बघितल्यावरही तिला नवलच वाटले.कारण सोनापूरपासून ते पेरजागडपर्यंत सगळी लोकेशन

दिसत होती, पण स्टॉपचा कुठेच निशाण दिसत नव्हता.कारण बहुतेक मोबाईल स्विच ऑफ झाल्यामुळे किंवा नेटवर्कच्या कमतरतेमुळे मॅप लोकेशन बंद दाखवत होते.ते म्हणजे पेरजागडाच्या पायथ्याशी.जिथे पेरजागडावरून कधीच जाता येत नाही.

आणि तसंपण शिवाय तिच्या गडावर कुणाला काहीच मिळालं नव्हतं.त्यामुळे रितुला वाटले की माझ्या मोबाईल वरून तिला काहीतरी मिळेल, पण इथेही तिची निराशा वाढली.कदाचित कॅमेऱ्यात काही फोटोज् असतील म्हणून इमेज बघू लागली.पण त्यातही तिला काहीच मिळाले नाही.उलट गडाच्या बऱ्याचश्या अशा दुर्मिळ फोटोज् दिसल्या ज्या तिने कधी बघितल्या पण नव्हत्या.

बाजूलाच उभे राहून इन्स्पेक्टर राठोडसुद्धा ते सगळे बघत होते.त्यांनी माझ्या मोबाईलचं ते शेवटचं मॅप लक्षात घेतलं आणि स्वतःच्या मॅप मध्ये ते बघू लागले.पण प्रात्यक्षिक करण्यासाठी त्यांना स्वतः तिथे जाणे गरजेचे होते. रितूच्या आणि त्याच्या मनात आता एकच प्रश्न पडला होता.की पवन इथे कुठे गेला असेल?

दुपारची वेळ होती आणि नुकतीच डबा घेऊन आई पण हॉस्पिटल मध्ये आली होती.त्यामुळे रितुला पण तितकीच मुभा मिळाली.आणि शिवाय ते ताबिज माझ्या दंडाला बांधलेले होतेच.आणि त्याचा महिमा पण तिने बघितलं होतं.त्यामुळे सगळं काही त्या ताबिजवर विश्वासाचा महामेरू ठेवून ती राठोड सोबत जाण्याची तयारी करू लागली.जाण्यापूर्वी क्षणभर माझ्यापाशी येऊन निश्चलपणे उभी राहिली आणि हातात हात घेत कपाळाची एक छानशी किसी घेत म्हणाली...

चाललोय रे तुला शोधायला...कदाचित तुला कळणार नाही.पण तुझ्याविना अपूर्ण असलेल्या संसाराला पूर्ण करायला. रक्ताचं थेंब न थेंब संपेपर्यंत मी तुझी वाट बघेन.चल येते मी..काळजी घे तोपर्यंत स्वतःची..आणि माझी सुद्धा...

डोळ्यांचे पारणे उजव्या दंडाने पुसत ती रुमच्या बाहेर आली.आणि तेव्हढ्याच कडक दटावणीने राठोडला म्हणाली...

चला सर..आता वेळ केलेली चालणार नाही.अजून बरंच काही गाठायचे आहे, जे अर्धवट आहे.

गाडीमध्ये काही हवालदार तसे सज्ज होतेच.रितू गाडीत बसताच पेरजागडाच्या प्रवासास शुरुवात झाली.एकदम गाडी थांबली ती पेरजागडाच्या खालील आवारातच.रितुसाठी काही हा आवार नवीन नव्हता, पण या वेळेस ती माझ्या शोधासाठी इथे आली होती.प्रत्येक बाजूला तिची एक शोधक नजर तरळत होती.अलगद माझ्या शोधार्थाने ती भटकत होती.माझ्या पाऊलखुणा स्वतःच्या प्रेमळ डोळयात भरवून होती.

शेवटी ज्या शिढ्यांवर लोळून पडलेला मी मिळालो होतो.राठोड तिला ती जागा दाखवत होते.आणि तशी आकृती तिथे बनलीच होती.त्याप्रमाणे रितू मला तिथे बघत होती.आणि तो फलक ज्याची अवहेलना करत राठोडने ते भोगले होते.तिने ती सूचना परत वाचली आणि पाय समोर उंचावून तिच्या प्रवासाला शुरुवात केली.

आज तिच्या नजरेत फक्त एक शोध उफाणून दिसत होता.एकप्रकारची आगतिक तडफड आणि मला शोधण्याची जिज्ञासा तिच्या चेहऱ्यावरून अगदी स्पष्टपणे जाणवत होती.कारण ती एकटी रितू नव्हती.माझी रितू म्हणून तिने गडावर पाऊल ठेवले होते.अगदी तिचे श्वास सुद्धा माझे नाव गुंजवत होते. स्पंदनांच्या

तीव्र गतीचा वेध आज ती पेरजागडाला दाखवत होती.की तिचं जीव अडकलाय इथं.त्याला न्यायला ती स्वतः आलीय.सावित्रीने जसे त्याचे प्राण यमराजाकडून आणले होते.तसेच माझे प्राण घ्यायला ती आली होती.आज एक पवनची पत्नी तिथे उभी होती.

सभोवार नजर टाकून तिने आजूबाजूच्या जंगलातली शांतता डोळ्यात साठवली.मागोमाग राठोड तीच पाठलाग करत होता.पण आज फक्त तिच सामोरी चालत होती.एका विश्वासाने, एका जिद्दीने आणि प्रयत्नाने.आणि परत चालू झाला तीचा दगडांवरचा प्रवास.पण तिचे पाऊल आज थांबत नव्हते.अगदी चालताना राठोड सुद्धा ओलाचिंब होऊन गेला होता.पण रितू मात्र चालतच होती.अगदी गडाच्या पायथ्यापर्यंत तिने धीर सोडला नव्हता.अगदी वाटेत असलेल्या गणपतीला सुद्धा तिने वाटेतच श्रद्धापूर्वक हात जोडला होता.

गडाच्या पायथ्याशी जलकुंभावर मग राठोडने मागे झालेली घटना जरा प्रत्यक्षिकपणे रंगवून सांगितली.जरा जिकडे तिकडे सभोवार लक्ष करत ती पुन्हा गडाकडे वळली. टोंगरे महाराज रहात होते त्या खोलीत जाऊन तिने बघितले.कदाचित तिला माझ्या बॅगेची आशंका असावी.मग वाटेत चालताना कधी ती काठावर

जाऊन, गडाची खालची बाजू बघायची.तर कधी दगडांच्या कप्प्यात जाऊन बघायची. चालताना प्रत्येक पावलावर तिच्या फक्त तेजी दिसत होती.मग चढताना ती सगळ्यांना बघत बघत हात जोडत अगदी सात बहिणीच्या मंदिरात आली.

आल्या आल्या तिने मंदिरात घंटा नाद केला.आणि सातही बहिणीच्या पाया पडून ती म्हणाली...

बहिणींनो अभागी आहे मी...अगदीच अभागी...माझं श्वास, माझं जीव तिथे हॉस्पिटल मध्ये तडफडत आहे.आणि मी इथे त्याचा शोध करतेय.त्याच्या प्रत्येक श्वासाला कुठेतरी मला चुकल्यासारखे वाटत आहे.त्याच्यावरचे मृत्यूचे सावट अगदी मलाही खेचून नेईल असे वाटत आहे.आणि मी पण जाणारच, हे ही मी कबुल केले आहे.आता तुझ्याच स्मरणार्थ पाऊल उचललं आहे.जर तुझे अस्तित्व असेल तर दाखव त्याला..कळू दे मलाही की काळझेप त्याची एकट्याची नाही तर माझी सुद्धा आहे.जाताना एकच म्हणेन की जायचंच असेल नशिबात तर त्याच्यासोबत मलाही जाऊ दे...अन्यथा माझा पवन माझ्याचपाशी असू दे...

तिची ही आगळी वेगळी इच्छा खरंच दगडाला सुद्धा पाझर आणणारी होती.तिच्या प्रत्येक कृतीला राठोड अगदी टक लावून बसले होते.काय चाललं होतं? हे तर त्याला नक्कीच कळलं होतं.पण आता अजून बरंच काही चालणार हेही त्याला वाटत होते.हवेची एक छोटीशी लहर भिरभिर करत कानापाशी येत होती.आणि जशी जशी ती गडाच्या सम्मुख येत होती.तिचा आकार आणि रूप एका वेगळ्याच वेशात धारण होत होतं.त्याप्रमाणे सगळे त्या सात बहिणीच्या मंदिराशीच बसून होते.आणि ती वाऱ्याची लहर अलगद सगळ्यांना स्पर्श करून गडावर चालली गेली.

उडलेला पालापाचोळा हाताने थोडं झटकल्यागत करत रितूने पुन्हा पाऊल टाकण्यास सुरूवात केली.ती समोर समोर आणि राठोड तिच्या मागे मागे.आणि त्याच्या मागे दोन पहारेकरी.अगदी तेच निसर्ग सौंदर्य गडाचे अगदी बहरून दिसत होते.चालताना फक्त वाटेवरला वाळलेला गवत पायांना डिवचत होता.पण तो काही वाट अडवू शकत नव्हता.प्रत्येक गुहेला,दगडांच्या कप्पीला अत्यंत बारकाईने रितू बघत होती.आणि राठोड सुद्धा आपल्या मोबाईलचे लाइव्ह लोकेशन बघत बघत रितू ला समोर चला म्हणत खुणवत होता.

"शेवटी काही वेळाने अचानक इन्स्पेक्टर राठोड थबकले.थांबा...लोकेशन संपलं..."

सगळे थांबले...पण ती जागा कोणती होती?ज्याच्या समोर मॅपची लोकेशन नव्हती.तो होता हत्तीखोयाळ.जिथून समोरचं काहीच त्या मॅप मध्ये नमूद नव्हतं.आणि सगळे जिकडे तिकडे बारकाईने बघत होते.अलगद किनाऱ्यावर असलेल्या झाडाचा आधार घेऊन राठोडने त्या खाईमध्ये बघितले.पण त्याला खाईतले काहीच नीटसे दिसेना.आणि गडावरून खाईत उतरण्याचा असा कोणताच मार्ग पण दिसत नव्हता.

शोधा अंतर्गत जेव्हा कुणाला काहीही मिळालं नाही.सगळे मिळून गडावर चढू लागले.प्रत्येकाने स्वतःच्या पद्धतीने बऱ्याच पैकी प्रयत्न केले.पण कुणाला काहीच तसे मिळाले नाही.त्यामुळे परत आता गडावर जावे असे सगळ्यांना वाटू लागले.एका मागोमाग एक असे सगळे शोधक नजर घेऊन गड चढत होते.

बऱ्याच प्रमाणात हिंडफिर करूनही जेव्हा सगळ्यांना काहीच कसं मिळालं नाही? याची रितुला फार प्रमाणात निराशा आली.आणि प्रत्येक काठावर ती जाऊन बघू लागली.कदाचित

तिला तरी काहीतरी मिळावं म्हणून.शेवटी जिथे दगडांची शिळा उभट असल्या प्रकारे होती.जिथे मेंधेपांडे महाराजांचं एकाष्म होतं.त्याच्या समोरच काही अंतरावरून तिला काहीतरी दिसलं आणि ती घाईघाईने गड उतरू लागली.

अद्याप तिच्या उत्साहाला जुमानता राठोडसुद्धा तिच्या मागोमाग आला.कारण त्यालाही वाटलं होतं की नक्कीच रितुला काहीतरी मिळालंच असणार.खाली उतरल्यावर रितू धावत धावत हत्तीखोयाळच्या दुसऱ्या बाजूला उभी राहिली.आणि तिने समोर बोट दाखवत इन्स्पेक्टर राठोडला इशारा केला.

हत्तीखोयाळच्या काठाला एक पाकळीचा झाड होता.ज्याच्या पारंब्या आणि मुळे दगडांना घट्ट पकडून होती.आणि अलगद त्याच्या पायथ्याशी माझी बॅग लटकून होती.जी वाटेवरून दिसत तर नव्हतीच पण अशीही नजरेला सहसा दिसत नव्हती.एका साथीदाराच्या मदतीने राठोडने ती बॅग काढली आणि रितूकडे दिली.रितू ने बॅग खोलून बघितलं तर माझ्या बऱ्याच काही वस्तू त्या बॅगेत पडून होत्या.ज्या तिला आवश्यक होत्या.

बॅग मिळाली यापेक्षा तिला आणखी काय महत्त्वाचं होतं.स्वतःभोवती गड जिंकल्याची स्मित उद्भवत ती गड उतरायला लागली, आणि राठोडलाही काहीतरी मिळाल्याचं समाधान मिळालं.कदाचित नियमांचे उल्लंघन करून जरी तो त्या गडावरून परतला नसता, तर कदाचित आज त्याला इतकं काही करावं लागलं नसतं.आणि ज्या पद्धतीने रितूने जे शोधकार्य केलं होतं, ते अगदी अद्वितीय होतं.आणि त्याप्रमाणे ते सगळे हॉस्पिटल मध्ये जमा झाले.

## २४)काही प्रमाणात नक्षाचा खुलासा....

अलगद बॅगेला बाजूला ठेवून रितू माझ्या शेजारी बसली.आई घरी नुकतीच जाण्यासाठी वाट बघत बसली होती.आणि तिला बघताच तिचीही चिंता मिटल्यागत झाली होती.डॉक्टरने सांगितलेल्या काही सूचना समजावून शेवटी आई तिथून निघून गेली.आणि एकटी रितू परत मला बघत माझ्यापाशी येऊन बसली.

केव्हा उघडशील रे डोळे?तिच्या मनात असलेला सततचा प्रश्न अलगद चेहऱ्यावर वाचून घेता येईल, अशा पद्धतीने प्रगट होत होता.आणि डोळ्यात आसुसलेल्या प्रेमाची धगधगलेली प्रीती ओसंडून वाहत होती.अगदी हात धरून मला उठवण्यासाठी तिचे हात तरसत होते.आणि हात हातात घेऊन तो निर्जीव असल्यागत झालेला स्पर्श स्वतःच्या मनाला सांत्वनत होती. तिचं प्रेम अजूनही जिवंत आहे याची साक्ष करून घेत होती.कारण तिला आता रहस्य उलगडायचे होते... मला कसंही करून मिळवायचे होतं.मनात प्रश्नाचं विचारचक्र ठेवून कितीतरी वेळ अशी माझ्याजवळ ओसंडून वाहत होती.

मग क्षणात एक कसलासा विचार तिच्या मनात जागा झाला.दोन्ही डोळ्यांतले अश्रू पुसून स्वतःला खिडकीत असलेल्या काचेमध्ये बघितले.रडती मुद्रा कठोर भावनेच्या स्वरूपात बदलवली.कारण ती समजून घेत होती की असं हरून चालणार नव्हतं.त्यासाठी स्वतःच स्वतःचा आधार बनायला पाहिजे.कुठपर्यंत अशी रडत बसणार?कारण त्याने काहीच साध्य होणार नाही.जर मिळवायचेच असेल तर मृत्यूच्या मागील कारण मिळवायला हवे.जे तिच्यापासून तिचे सर्वस्व ओढून नेत होते. तिचं प्रेम, तिचं जिवन सगळंच तिच्यापासून हिरावून नेत होते.आता हे थांबवायला हवं..अगदी संपायला हवं...मला परतायला हवं...

एकतर्फी जिद्दीने तिच्या डोळ्यात अधाशी झाक आली.आणि तिने वळून माझ्या बॅगेपाशी बघितले. तसं तिच्याशिवाय त्या खोलीत येणारे फारसे कुणी नव्हते.त्यामुळे तिने अलगद ती बॅग खोलली.आणि एक एक रकाना ती खोलून पाहू लागली. हेड फोन, पॉवर बँक काय ती सेल्फी स्टिक तिथे ठेवली होती.आणि परत खोलात बघितलं तर तो लॉकेट मिळाला ज्यावर तिचं आणि माझं

नाव एका तांदळाच्या दाण्यावर लिहिलं होतं.जे माझ्या प्रेमाचं पाहिलं देणं होतं.

अलगद हातात लॉकेट घेऊन डोळ्यासमोर तिने तो लॉकेट पकडला.आणि काही क्षणचित्रे तिच्यासमोर रेंगाळू लागली.आणि आठवणी त्यांना उफानुन भूतकाळात नेऊ लागल्या.

त्या दिवशी कसल्याशा गोष्टीवरून आमचा वाद चालला होता.त्या दिवशी आम्ही रोजच्यासारखे भेटले होतो.सांगितल्यानुसार कित्येकदा आम्ही भेटायचो.पण म्हणतात ना मुलींची काहीतरी वेगळीच अट असते.तशीच तिचीही होती.बालपणापासून असे आम्ही एकमेकांना बघत आलो होतो.ज्यामुळे प्रेम होण्यासाठी अशी नजरेची गरजच पडली नाही.फक्त असायचा तो निष्काम सहवास.कधी दैनंदिनी व्यवहारा मार्फत बोलणे तर कधी परीक्षेच्या पेपर मार्फत बोलणे.आणि पूर्वापार सतत ओघात आलं ते बोलून देणे, असल्यामुळे तेव्हा प्रेमाची फिलिंग मांडणे हे जरा अवघडच वाटायचे.

तसं पहिल्यांदा मला ती कॉलेजच्या ग्यादरींगलाच आवडली होती.मोकळे केस,ओठावर पुसटशी लाली,डोळयांभोवती इवल्याश्या काजळाचे रेघ.आणि खरं म्हणजे ती साडीवर इतकी शोभून दिसत होती, की ती जेव्हा माझ्याकडे नजर रोखून बघायची.मी अलगद नजर तोडून इकडे तिकडे बघू लागायचो.तिला कळायचे सुद्धा नाही..काय चाललय ते.पण म्हणतात ना तारुण्याच्या उंबरठ्यावर येताना प्रत्येकालाच त्याची प्रचिती असते.आणि निदान त्या वेळेस तरी ती माझी फक्त आवड होती.

आमचा मुलांचा एक वेगळाच ग्रुप होता.फक्त बडबोल्या सद्या तेव्हढा आमच्यात जुनाच असायचा.स्टेजवर रितू येताच पब्लिकमध्ये एक जोश आला होता.कारण पहिल्या टॉपरची भूमिका गाजवणारी रितू नसली तरी प्रत्येक वेळा ती काही हटके करायची.संभाषण ती इतक्या शक्तिनिशी करायची की त्याचा प्रभाव अगदी वर्गावर्गात भरून दिसायचा.

कॉलेजच्या जवळचे असल्यामुळे आम्हाला तितकं भय नव्हताच, पण हल्ली कॉलेजमध्ये फार प्रमाणात रॅगिंग

व्हायची.आणि रितूने नेमका तोच मुद्दा म्यानेजमेंटच्या समोर मांडला होता.खरंतर तिच्या अस्खलित भाषणावर कितीतरी मुले फिदा व्हायची.त्यातलाच एक उदय.भाषणाला जेव्हा शुरुवात झाली.आमच्या समोरच त्याची टवाळखोरी गॅंग होती.सगळे अगदी मंत्रमुग्धपणाने भाषण ऐकताना, याची मात्र टवाळखोरी चालू...

कसले ते इशारे करणे, फ्लायिंग किस देणे हे सगळं मी बघतच होतो.पण एकाच वेळेस मला काही करायला शोभले नसते.म्हणून मी गुपचूप होऊन बघत होतो.पण जेव्हा त्याने रितुच्या बाबतीत काही घाण शब्द उच्चारले तेव्हा इतका किळस आला मला त्याचा.आणि इतकी घृणा तयार झाली की काय हावी होत आहे माझ्यावर? जे मलाच कळले नाही.आणि मी कसलाही विचार न करता डाव्या हाताने त्याची मानगूट पकडून सरळ मागे खेचत आणले.

सगळे येईपर्यंत त्याला इतकं चोपलं, इतकं धुतलं की पून्ह्यांदा कुणा मुलींचं नाव पण घेणार नाही.पण तो शेवटी टवाळच..त्याला काय सुचणार.उलट मलाच तो म्हणाला..कोण आहे तुझी? प्रेयसी आहे तुझी?अरे तुझ्या मनात काही नाही तर आम्हाला प्रेम करू दे

ना,जेव्हा तिला माझ्या विषयी कसलीच तक्रार नाही तर तुला काय प्रोब्लेम आहे.रागाच्या भरात मी त्याला आणखी एक ठेवणार होतो, पण त्याचे बोलणे ऐकून मी आणखी दोन पावले मागे वळलो.

कारण एकंदरीत त्याचंही म्हणणं अगदी बरोबर होतं.एव्हाना सगळे तरुण तरुणी भोवताल जमा झाल्या होत्या.रितू पण काय चाललंय? हे बघण्यासाठी तिथे आली होती.मित्रांनी केव्हाच माझ्याभोवती गराडा टाकून मला खिंचताण करत होते.पण कळत नव्हते त्याच्यावर मी इतका का रागावलो होतो.झालेल्या प्रसंगानंतर मग मी एकांतात असणाऱ्या ग्राऊंडवर चालला गेलो.

"एकटाच तिथे बाकावर बसलेला बसून मागोमाग सगळे मित्रही तिथेच जमा झाले.तेव्हा सद्याच म्हणाला.."

"का यार पवन...काय सॉल्लिड धुतला यार त्याला...पण उगाचच मारलं यार त्याला..."

"अरे पण बघितलं ना तू..काय वात्रटगिरी करत होता तो..तू होतास ना तिथे.."

"अरे मग काय केलं त्याने...काही वेगळं केलं काय?"

"म्हणजे...मी समजलो नाही सद्या...जरा स्पष्ट बोल..उगाच कोड्यात नको बोलू..."

"अरे स्पष्टच बोलत आहे..काय केलं त्याने..?"

"काय केलं म्हणजे...हे सगळं काहीच नव्हतं..मी वेडेपणा केला काय?...विनाकारण चोपला त्याला..."

"हो विनाकारणच चोपला त्याला..."

"सद्या... अती होतंय ह...मित्र म्हणून काहीही ऐकून घेणार नाही तुझं..."

"मग सांग रितुला, त्याने तिला काही म्हणताच तुला त्याच्या बद्दल इतकी घृणा कशी का आली...की भर ग्यादरींगमधून तू त्याचं बखोटा धरून खेचलास.."

"माहीत नाही.."

"अरे कसं समजणार वेड्या तुला..ह्या भावनाच अशा विचित्र असतात..की आपल्या हातून काय कृत्य होतेय याची जराही जाण नसते.कारण त्या बोलायच्या नसतात..आपल्या कृतीतूनच त्या दिसत असतात."

"नेमकं म्हणायचं काय तुला?"

"तू रितुला पसंद करतोस पवन..ती आवडते तुला.."

"काहीपण बोलू नको सद्या...ती फक्त बालपणापासूनची एक मैत्रीण आहे..तिला काय वाटणार हे सगळं ऐकून..."

"इथेच तर चुकतो आहेस मित्रा...कारण ज्या वेळेत तू उदयला त्या पद्धतीने चोपलास ना..तसे कृत्य रितूवर प्रेम करणाराच करू शकतो.आणि उदय तर फक्त बहाणा आहे रे..त्याने कितीही प्रयत्न केले तरी ती त्याला कधीच होकार देणार नाही."

"पण हे.... शिट...नाही सद्या.."

"वाटलंच होतं..पण तुला अजूनही वाटत नसेल तर जाऊन विचार रितूला..."

खरंतर त्याच्याही गोष्टीत तथ्य होतंच.आणि तो चुकीचेही बोलत नव्हता.पण बऱ्याचश्या गोष्टीत बोलताना मला तिच्यासोबत काहीच जाणवत नव्हतं.अगदी समोरासमोर तासनतास बोलायचो.पण जेव्हा प्रेमाच्या बाबतीत काही विचारायचं म्हटलं की जिभेला गोंद लागल्यागत चिकटून राहायची.शब्द असा निघत नव्हता.आणि त्या दिवशीच्या प्रसंगाची कारणेपण रितुला कळलीच होती.त्यामुळे ती पण अशी परस्पर बोलत नव्हती.कारण बहुधा तिलाही माझ्याच तोंडून ऐकायचं असेल.

त्या प्रसंगानंतरही कदाचित एक दीड सप्ताह तरी मी तिच्याशी बोललो नसेल.कारण ती सामोरी आली की हृदयात कसली तरी हालचाल व्हायची. बोलावंसं वाटून सुद्धा हिम्मत व्हायची नाही.त्यामुळे बऱ्यापैकी माझं कुठेच असं लक्ष लागत नव्हतं.त्या दिवशी कॉलेजला येतानाच एक अंगठ्या विकणारा फिरस्थी भेटला.त्याच्याकडे असलेले ते लॉकेट मला फार आवडले होते.आणि मुख्ख्य म्हणजे इवल्याशा तांदळावर तो नाव लिहून एका छोट्याश्या काचेच्या बॉटल मध्ये टाकायचा.जे फार छान वाटायचे.

मी त्याला एका बाजूला माझं नाव आणि दुसऱ्या बाजूला तिचं नाव लिहून मागितलं.आणि आनंदाने शंभर रुपये त्याच्या खिशात कोंबले.आता तिला फक्त द्यायचे कसे? याचा विचार करत मी उभा होतो.कारण कॉलेजला सुट्टी झाल्याशिवाय तिची माझी भेट होणार नव्हती.एरवी मी बोलणं बंद केल्यामुळे ती इतर मुलींसोबत चालली जायची.

सुट्टी झाल्यावर गेटपाशीच मी तिला गाठलं आणि रितू म्हणून हाक मारली.तिने एकवार माझ्याकडे बघितलं आणि म्हणाली .."काय झालं? काही महत्त्वाचं आहे का?"

"काय म्हणजे? महत्त्वाचंच बोलायला यायचं तुझ्यापाशी?"

"तसं नव्हे...पण इतक्यात वेळ नव्हती ना बोलायला...म्हणून म्हटलं...?"

"अच्छा... बरं ऐक ना...तुझ्यासाठी काहीतरी आणलय मी..( आणि मी हाताची मुठ तिच्यासमोर उघडली.)"

तिने ते लॉकेट स्वतःच्या हातात घेतले आणि न्याहाळून बघू लागली. त्यातलं ते तांदूळ आणि त्यावर असलेले ते दोघांचे नाव.बहुधा कोणत्या गालावर थापड बसते मी ह्याचाच विचार करत होतो.पण काही क्षणानंतर शेवटी रितूच म्हणाली...आत्ता फक्त हा गिफ्ट देणार आहेस की गळयात पण घालणार आहेस.मी अवाकपणे तिच्याकडे बघतच राहिलो.कारण मला असली अपेक्षा नव्हतीच.पण मग तीच म्हणाली..

"किती दिवस झाले ह्या गोष्टीसाठी मी आसुसले होते.पण काय रे? इतका कसा भित्रा तू? नाही तेव्हा बराच काही बरळत असतोस, आणि आता प्रेमाच्या गोष्टी बोलायला भिती वाटतेय हो...घे.."( लॉकेट माझ्या हातात देत.)

"पण का? ..."( थोड्याशा नाराजीने)

अरे लोकं नावे ठेवतात.हे आपल्या प्रेमाची पहिली भेट आहे.ज्या दिवशी मी तुझी होऊन येईन ना, तेव्हा गळयात घालून देशील.तोपर्यंत माझी एक आठवण म्हणून कायम जपून ठेव...ठेवशील ना...

"हो..."( आनंदाने)

तेव्हापासूनचा तो लॉकेट आजपर्यंत माझ्याकडे, तिची फक्त एक आठवण म्हणून राहिला होता.आमची पहिली भेट मी इतक्या

प्रमाणात जपून ठेवली असेल, असे तिला कधीच वाटले नव्हते.त्या भेटीने आज परत एकदा तिला तिच्या जुन्या आठवणींत नेले होते.

आणि मग परत तिची लक्ष मधल्या खाण्यावर गेली.आणि त्यातलं शिलालेख तिने बाहेर काढलं. त्यावरचं कोड तर तिला माहीतच होतं.कारण सगळ्यात आधी मॅप वर बघताना ती माझ्याच सोबत होती.पण आज जेव्हा तिने हातात ते नक्षाचं शिलापत्र घेतलं होतं.तेव्हा तिला बरेच काही वेगळं दिसत होतं.म्हणजे काहीतरी ती वेगळं बघत होती.जे आधी तिला दिसलं नव्हतं.

मोबाईलचं मॅप ओपन करून ती नक्षात आणि मोबाईलच्या मॅपमध्ये काहीतरी शोधत होती.पण नक्कीच तिथे चाललेली गुंतागुंत ही तिलाही कळत नव्हती.त्यावर असणाऱ्या सगळ्या रेषा मिटल्या होत्या.फक्त त्या कलाकृत्या अगदी स्पष्टपणे तिथे दिसत होत्या.त्यावरून तिला काय तथ्य काढावे काहीच उमगत नव्हते.दोन्ही भुवयांना जवळ करून ती फक्त विचार करत होती.समजून घ्यायचा प्रयत्न करत होती.कधी मोबाईलच्या मॅपमध्ये तर कधी त्या नकाशात.

शेवटी कंटाळून तिने तो नकाशा बॅग मध्ये टाकला आणि मोबाईल बंद करून ती माझ्या जवळ आली.एक प्रेमळ कटाक्ष टाकत माझ्यापाशी खुर्ची लावत ती झोपी गेली.

अचानक कसल्याशा भासाने तिला जाग आली.कुणीतरी तिचं नाव घेऊन ओरडत आहे, असं भास तिला येत होता.तिने तो आवाज ओळखला,कारण तो आवाज माझा होता.आणि तो आवाज येताच खळाळून ती उठली.इकडेतिकडे न बघता समोर पडलेल्या माझ्या देहावर तिची नजर खिळली.पण माझ्यात नसलेला कसलाही बदल ती जाणून घेतच होती.त्यामुळे हा आवाज कुठून येत आहे?याचा विचार करत आजूबाजूला बघत होती.

आवाजही इतक्या सूक्ष्म पद्धतीचा होता.की जेमतेम कानापाशी रेंगाळेल इतकीच त्याची धाव होती.त्यामुळे रितु खोलीतल्या खोलीत इकडेतिकडे हुंदडून बघू लागली.शेवटी शोध न लागल्यावर त्रासून ती आपल्या खुर्चीवर बसली, आणि भास असेल कदाचित म्हणून माझ्याकडे बघू लागली.पण तीचं लक्ष त्या बॅगेकडे गेलं आणि ती आश्चर्यचकित झाली.मघाशी बॅग लावताना

तिने चैन अर्धवटच लावली होती.ज्यामुळे तिथून एक लाल रंगाचा प्रकाश पसरला होता.ज्याची किरणे आजूबाजूला पसरत होती.आणि त्या किरणांतूनच तो आवाज अगदी बारीकपणे ऐकायला येत होता.

रितूने ती बॅग उघडली आणि आतल्या रकान्यातून तो नक्षाचा कागद बाहेर काढला.तो सगळा प्रकाश त्या नक्ष्याच्या कागदातून येत होता. नेमकं हे काय आहे म्हणून रितूने तो नक्षा समोर असा पसरवला.त्या प्रकाशाच्या किरणांत प्रत्येक कलाकृती उमेदून दिसत होती.आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो प्रकाश त्या प्रत्येक कलाकृती मधून निघत होता.जी जंगलात काही ठराविक भागात बनलेली होती.आणि कसलीशी आकृती नागमोडी स्वरूपात जिकडे तिकडे फिरत होती.जी एक सापासारखी वाटत होती.आणि पेरजागडाच्या पायथ्याशी एक छोटासा गोल होता.ज्यात होणारी हालचाल तिला माझी वाटत होती.तिला येणारा आवाज हा तिथूनच येत असावा असे तिला वाटत होते.हे नक्कीच माझ्या तर्फे तिला येणारे संकेत आहे हे ती ओळखत होती.

काही वेळाने ती सापासारखी सरपटणारी कलाकृती त्या गोलाजवळ आली आणि एक किंकाळी रितुच्या कानात गुंजू लागली.सगळे प्रकाश किरण आपोआप बंद पडले आणि सगळं काही जसे आधी होते तसेच झाले.रितूला कळलंच नाही काय घडत आहे ते?पण माझ्या किंकाळीने तिने नेमकं हे ओळखलं होतं की, आता माझ्या जिवाला फार प्रमाणात धोखा निर्माण झाला आहे.

ती विचार करू लागली, की मी इथे बेडवर पडला असता, माझा आवाज तिथे कसा?काय होतं ते संकेत?आणि आडीमोडी चालणारी ती कलाकृती म्हणजे, नक्की होती तरी काय?आणि अचानक तीच आकृती त्या गोलाजवळ जाताच अचानक हे काय झालं?आणि मग ही किंकाळी...हे नक्की होतं तरी काय? खरंतर रितूसाठी हा फार मोठा संकेत होता.पण रितूला तो कळायला येत नव्हता.कारण मी हरवलो होतो एका अंधाऱ्या विश्वात, ज्यातून माझी सुटका होणे शक्य आहे की अशक्य आहे.हे मलासुद्धा माहीत नव्हते.

कारण ज्या रहस्यासाठी मी पेरजागड गाठलं होतं.प्रत्येक वेळेस मला तो गड तितक्याच कोड्यात नेत होता.ज्या गोष्टींचं मी विचार करायचो.अर्थात श्रध्देचं रूप सत्व.जे आजतागायत अशा गुप्त स्वरूपात असेल म्हणून मला कधीच वाटत नव्हते.पण आज अनुभवांच्या शिखरावर पाऊल ठेवल्यावर विचारांचा कितीतरी मोठा तपशील डोळ्यासमोर होता.आता बघायचंच राहिलं तर स्वतःचं वैयक्तिक एक विचार असतं जे स्वतः पुरताच एक मर्यादित असतं.पण जेव्हा तो घराच्या बाहेर पाऊल टाकतो.त्याच्या भावना उंचावतात.आधी घरासमोरची गल्ली,मग वार्ड,मग गाव मग चाललं विचारांचं शिखर वाढत.

मग कालांतराने जेव्हा आपलं मन मग पृथ्वीच्या बाहेरच्या जगात जातं, तेव्हा भावना शून्य होऊन जातात.ही एक वेगळी गोष्ट आहे की, आपण त्याला कल्पना करतो क्षितिजाची.पण त्या पार जाताना संस्काराची भावना,काळजी ही सूत्रे असतातच काय आपल्या मनात?जसजसे आपण विशाल विश्व वावरत जातो अगदी तसतसे आपल्या विचारधारा बदलतात.जाणीव, भावना संपतात आणि उच्च विचार प्रगटतात.

आता झालेल्या त्या प्रसंगात रितूला काय करावे? हे तर मुळीच कळत नव्हते.पण पेरजागडाच्या पायथ्याशी नक्की काही तरी घडत आहे.हे तिला कळत होते.त्यासाठी सगळयात आधी तिने फोन लावला तो राठोडला.अतिशय वेंधळलेल्या परिस्थितीत झोपेतून त्याने फोन उचलला, आणि कोण आहे? असे दरडावत विचारले. ठरल्याप्रमाणे रितुने घडलेला पूर्ण प्रसंग त्यांना सांगितला आणि उद्याबद्दल काय तयारी करायची आहे.याबद्दल पूर्वकृती सांगितली.

रात्रभर रितू त्या बाबतीत विचार करत होती.शेवटच्या सकाळच्या प्रहरेने तिला झोपेच्या डुलक्या येत होत्या.सकाळचे रम्य प्रहरी थोडीशी झोप घेत तिने डोळे उघडले.रोजच्यासारखी सिस्टर येऊन तपासणी करू लागली.सगळं काही जसेच्या तसे बघुन रिपोर्ट करून चालली गेली.कारण त्या दिवशीच्या ताबिजमुळे मृत्यू माझ्यावर हावी होत नव्हता.हे आदल्या रात्रीच तिने ओळखलं होतं.त्यामुळे आता तिला भय नव्हता.भय होताच तर आता फक्त माझ्याविषयी असलेल्या रहस्यांचा.

प्रातः विधी उरकून तिने चहाचा घोट घेतलाच होता की तेव्हढ्यात दारावर इन्स्पेक्टर राठोडची मूर्ती तयारच होती.आणि सोबत त्यांचे ते दोन हवालदार.आणि एक अनुभवी तज्ञ ते सोबत घेऊन आले होते.जसं की रितुने त्यांना सांगितलं होतं.तो नक्षा बारकाईने बघत ते तज्ञ म्हणाले...

"हा नक्षा तुम्हाला कुठून मिळाला? आय मीन कुणी दिला?"

"हा नक्षा पवन च्या बॅगेत होता.त्याला हा नक्षा एका इसमाने दिला होता...पंढरपुरात...पण काय झालं?"

हा नक्षा काही साधासुधा नक्षा नाही.ह्यावर बरीच काही प्रतिकृती आहे.आजच्या युगात जी कलाकृती दिसते.त्याला फक्त वैज्ञानिकाच्या मते मानल्या जाते. त्याचंच तथ्य अनुकरून त्यावर विशेषण दिले जाते.पण जगात अध्यात्माची पण काही पाऊलवाट आहे. हल्ली लोकांच्या मते ती लुप्त होत चाललीय.पण खरं तर ती लुप्त झाली नाही.तर स्वतःला अजून संरक्षण करते आहे.

"म्हणजे...मी समजली नाही..."

अहो हे बघा..त्याने बॅगेतून काही पुस्तके काढली.रामायण काळात हे जंगल तेव्हढेच दाट होते जितके की आज आहेत.प्राचीन काळात अशी बरीचशी उदाहरणे आहेत ज्याचं आजही वास्तव्य आहे.म्हणून रामायण काल्पनिक नाही.चौदा वर्षाच्या वनवासात त्यांचा नऊ ते दहा वर्षांचा वनवास मध्यप्रदेश ते छत्तीसगडच्या जंगलात झाला आहे.रामगिरी पर्वत ज्याची आजही मुभा देते. ज्यावेळेस ते या जंगलातून भ्रमंती करीत होते.त्यावेळेस हे जंगल भयानक सर्पांनी भरलेलं होतं.त्यातील भयानक सर्पांचा नायनाट झाला.पण लोकांच्या मते एक साप अजूनही जिवंत आहे.जो कदाचित कोणाला दिसतो.आणि मुख्य म्हणजे इथल्या धनद्रव्याचा रक्षक तोच आहे.

गेली आठ वर्षे मी सुद्धा या जंगला बद्दलच रिसर्च करत आहे.इतरांना वेडा वाटतो.पण जंगलाविषयी बरंच काही माहिती केलं आहे.आधी शिवशंकराचं बऱ्यापैकी वास्तव्य दिसायचं.पण कालांतराने सगळं अर्धाअर्धी झाले. त्याचं डोकं तिकडे,त्रिशूळ इकडे ,आणि शंख बाजूला अशा प्रकारे.पण यातलं रहस्य आजही कुणाला कळलं नाही.

"अच्छा...म्हणजे हे जंगल साधारण जंगल नाही.यात खूप काही अशा गोष्टी आहेत..ज्या दडलेल्या आहेत."

बिलकुल बरोबर... इथं सत्व दडलाय.आणि जो निर्मळ मनाने तिथे गेलाय.त्याला नक्कीच ते मिळाले आहे.कारण जंगल असूनही तिथली शांतता माणसाला अपरिचित करते.त्या जंगलाचे स्वतःचे आगळे वेगळे नियम आहेत हे तुम्हाला माहीतच असेल.पण त्या नियमांना चालवणारे सुद्धा तसेच अज्ञात आहेत.अत्यंत कमी प्रमाणात मृदा आणि जास्त प्रमाणात शीला आहे.जवळपास पाच ते सहा अशी ठिकाणे आहेत.जिथे उंच अशा शिखरावरून पाणी वाहते.आणि तेही बारामाही.

हे असे जंगल आहे.ज्यात रामाचाही वास आहे.आणि पाच पांडवांचाही.ज्यांची गुंफा तुम्ही बघितलेच असेल.सगळ्यांचं अवतारकार्य संपल्यावर चालू झालं हे कलयुग.पण सगळ्यात आधी इथे आदिवासीचे वास्तव्य होते.ज्यांच्या देवता आजही जंगलात कार्यरत आहेत.कालांतराने होत आलेल्या जंगल तोडीमुळे हे भाग इतर जंगलापासून अलग झाले.पण आजही या जंगलाची हिंस्त्रता कमी झाली नाही.

हा नक्षा तुम्हाला त्या जंगलाचं ते रूप दाखवते.तिथे काय चाललंय? कशाचे वास्तव्य आहे? एकप्रकारची शंका उत्पन्न करते.या नक्षाबद्दल बरीच माहिती माझ्या पुस्तकात आहे.( एक पुस्तक रितूच्या हातात देत.)हे वाचून झाल्यावर तुम्हीच समजून घ्याल की काय आहे त्यात?

पवन प्रकरण खूप दिवस झाले.कानी आहे माझ्या.पण मुळात पेरजागडाशी त्याचं काही वास्तव्य असेल असे मला वाटले नव्हते.वर सोशल मीडियात त्याचे इतके तथ्य चालले आहेत की आमच्यासारखे साधे माणसं या दरवाज्यात पण येऊ शकत नाही.पण आत्ता कळलं...निश्चितच मी आपली मदत करेन...

"धन्यवाद..."( रितू हात जोडत सामोरी आली.)

अहो त्याची काही आवश्यकता नाही.माणूस म्हणून माझे पहिले कर्तव्य आहे ते.आधी तुम्ही ती माहिती नीट समजून घ्या.मग वेळ काढून गडावर जाता येईल.आणि काही वाटलेच तर राठोड

साहेब आहेतच मला सांगायला.चला येतो मी.आणि इन्स्पेक्टर राठोड व ते प्रसिद्ध तज्ञ आचार्य राऊत पण निघून गेले.

शेवटी आपला प्रश्न तितक्यावरच थांबला.की शेवटी पवन होता कुठे? काय आहेत या पेरजागडाची रहस्ये?प्रश्न असणारच ना...आणि उत्सुकता पण.पवन सोबत काय झालं असेल?पुढे रितू काय करणार?अशी प्रश्ने वारंवार मनात घर करत असतीलच..त्याची उत्तरे लवकरच आपणांस मिळणार... पेरजागड भाग चार मध्ये...तोपर्यंत पेरजागड भाग एक,दोन,तीन यांचं वैयक्तिक अभिप्राय द्यायला विसरू नका...

आपला

कार्तिक हजारे...

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.**

**कार्तिक हजारे यांचं ई साहित्यवरचं हे सहावं  पुस्तक.**

कार्तिक हजारे चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागातील एक युवक. परिस्थितीच्या निखाऱ्यांनी त्यांच्यातील लेखकाला करपवण्याचा खूप प्रयत्न केला. त्यातून त्यांची शैली आणि भाषा पुण्यामुंबईच्या अभिजनवर्गापासून वेगळी. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये आशयाची ताकद आणि अभिव्यक्तीमध्ये ठोस मांडणी असूनही त्यांच्या साहित्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळात नव्हता. त्यांनीच म्हटाले आहे की लिहीण्यापेक्षा जास्त टेन्शन येते ते लिहीलेले दुसऱ्याला दाखवण्यात. पण ई साहित्यवर त्यांची पहिली तीन पुस्तकं गाजली, वाचकांनी वाखाणली तेव्हा मात्र त्यांना हुरूप आला.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर

लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे,

सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि

आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.

ही नवीन लेखकांची दमदार फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान